परमपिता परमात्मा त्रिमुर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव।'

अमृतकुंभ

अंतरंग

वर्ष १० • अंक २ • जून-जुलै २०१६

मुखपृष्ठाविषयी

राजयोगाद्वारे स्वस्थ मानव जीवन

२१ जून - आंतरराष्ट्रीय योग दिवस विश्वातील १७७ देश साजरा करीत आहेत. आज अनेकांमध्ये शरीर स्वास्थाच्या दृष्टीने जागृती आली आहे. अनेक जण वेळात वेळ काढून आसने, प्राणायाम आदी करीत आहेत, जेणेकरून शरीर स्वास्थ्याबरोबर मनावरील ताण रोजच्या रोज घालवण्याचा प्रयत्न करतात. परंतु डॉक्टर्सचे असे म्हणणे आहे की, ८०% आजार हे मानसिक तणावामधून निर्माण होत आहेत. यासाठी शिव परमात्मा शिकवित असलेला राजयोग हा त्यावरील योग्य उपाय आहे. या चित्रात चित्रकार हेच दर्शवत आहे की, राजयोगाद्वारे रोजची कर्म करतानाही कर्मामध्ये किंवा संबंध व वस्तूमध्ये लिप्त न होता, त्याच्या प्रभावाखाली न येता आपण अलिप्त राहू शकतो. ज्याप्रमाणे कमळाचे फूल हे पाण्यामध्ये किंवा चिखलामध्ये असूनही निर्लिप्त असते. अलिप्त राहिल्याने मानसिक संतुलन राखले गेल्याने अनेक आजारांपासून आपण दूर राहू शकतो. तात्पर्य म्हणजे राजयोगी जीवनाद्वारे मानव तन व मन स्वस्थ राहू शकते. दि. २१ जून रोजी असलेल्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

- प्रकाशक अमृतकुंभ

१. ईश्वरीय गणित २
२. जगदंबा सरस्वती सर्व गुणांची साक्षात मूर्ती (संपादकीय) ३
३. राजयोगाचे सहज स्वरूप ७
४. राजयोगाची विधी आणि प्राप्ती ९
५. मन-एक संग्रहालय १३
६. राजयोगाच्या अभ्यासाने होणारे फायदे १४
७. सचित्र सेवावृत्त १५
८. संगमयुगी सद्गुरु पौर्णिमा अत्यानंदे करुया... १९
९. ईश्वरीय सेवेच्या साधनांमधील परिवर्तनाचा... २१
१०. असत्य नरनारीपासून सत्य श्री लक्ष्मी नारायण बनण्याची सत्यकथा २४
११. ईर्ष्या, द्वेष व घृणा यापासून सावधान...! २९
१२. ३० मिनीटे चालण्याचे ३० फायदे ३२

फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता : संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३, • **वर्गणी पाठविण्याचा पत्ता** : बी.के.गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३. फोन : ०२२-२५३२२२०८. मोबाईल : ९८२००२३०९२ • E-mail :info@amrutkumbh.com. • संगणक अक्षरजुळवणी : मीडिया आर ॲण्ड डी प्रा. लि. १३, अमृत मधुरा, प्लॉट ३, सेक्टर ३, आरएससी २८, चारकोप, कांदिवली (प) मुंबई – ४०० ०६७

डिमांड ड्राफ्ट 'अमृतकुंभ' या नावाने पाठवावा.

वार्षिक वर्गणी रु. ६५/- • आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/-

E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या - www.amrutkumbh.com

ईश्वरीय गणित

- दिवंगत ब्र.कु. जगदीशभाई (ज्ञानामृत - माजी संपादक)



एक प्रचलित म्हण आपण सर्वांनीच ऐकली आहे की एक आणि एक अकरा होतात. गणिताच्या सामान्य नियमानुसार, एक आणि एक दोन होतात, मग हे अकरा कसे? यामध्ये अवश्य काही वेगळ्या प्रकारचे गणित आहे. ज्याला आपण कर्मगणित, ईश्वरीय गणित वा आध्यात्मिक गणित म्हणू शकतो. अंकगणित, बीजगणित, रेखागणित, खगोलगणित, ज्योतिषगणित, वैदिक गणित इत्यादी नावे अनेकांना परिचित आहेत. या सर्व शाखांचा अभ्यास कोण्या व्यक्तीने नसेलही केला, तरी सामान्य गणित तर गरीब-श्रीमंत सर्वांच्या दैनंदिन कार्यव्यवहारात कामाला येतेच. सर्व साधारणपणे व्यक्तीला सामान्य गणिताचे ज्ञान जितके आवश्यक असते. त्याहीपेक्षा अधिक ईश्वरीय गणिताचे ज्ञान आवश्यक आहे. सामान्य गणिताच्या आधारे आपल्या हिसाब-किताब, देण्याघेण्यात स्पष्टता येते. ईश्वरीय गणित वा कर्मगणिताने वर्तमान जीवन आणि पुढील जन्मांचे कर्माचे खाते स्पष्ट होते.

एक आणि एक मिळून शून्य

कर्मगणितानुसार, कित्येक वेळा एक आणि एक (दोन व्यक्ती) अशा प्रकारे आपसात कर्म करतात की, त्यांच्या कर्मसंबंधाचा परिणाम शून्य होतो. उदाहरणार्थ, एका व्यक्तीने एक कारखाना सुरू केला. कामाच्या वाढत्या व्यापाकडे पाहून त्याने एका व्यक्तीला आपले भागीदार बनविले. काही दिवस तर सगळं काही सुरळीत चालले. कालांतराने मालकाला आपल्या भागीदारावर पैशाची हेराफेरी केल्याचा संशय उत्पन्न झाला या कारणाने तो आतल्या आत चरफडत राहिला. सरतेशेवटी एक दिवस काही समाज कंटकाकरवी त्याची पिटाई केली. भागीदार जखमी झाला. काही दिवस त्याच्यावर इलाज चालला. त्यानंतर त्याने देह सोडला. भागीदाराच्या कुटुंबियांना, कारखान्याच्या मालकावर पूर्ण संशय होता. बदल्याच्या भावनेतून त्यांनी संधी साधून कारखान्याला आग लावली. कारखाना जळून भस्मसात झाला. आग लावण्यास निमित्त कारण कळल्यावर भागीदाराच्या परिवाराला पोलीस कोठडी झाली. अशाप्रकारे दोन्ही परिवार बरबाद झाले. जेव्हा दोन व्यक्तींच्या आपसातील संबंधामध्ये ईर्ष्या, द्वेष, शंका, अनुमान, दोषदृष्टी, अहंकार, स्वार्थ इत्यादि वृत्ती उत्पन्न होतात आणि त्याचा परिणाम एक दुसऱ्याच्या अस्तित्त्वावरच घाला घातला जातो तेव्हा अशा मीलनाचा परिणाम शून्यापेक्षा वेगळा काय होणार! दोघेही आपले नाव, आपले काम आणि शांती नष्ट करवून गुमनाम होतात जणू रंगमंचावरील आपली उपस्थितीच शून्य करतात. जर या परिणामापासून दूर राहू इच्छित असाल, तर थोडे सहन करावे लागेल, नुकसान सोसावे लागेल, पडती बाजू घ्यावी लागेल, स्वतःला बदलावे लागेल आणि इतकेही करू शकत नसाल तर किनारा करावा लागेल. परंतु ईर्ष्या, द्वेष, नफरत, दोषदृष्टी ठेवून स्वतःला व इतरांनाही संपवण्याचा मार्ग अवलंबू नये.

एक आणि एक मिळून दोन

जेव्हा एका व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीबरोबर सामान्य संसारिक, संबंध जुळतात. तेव्हा दोघांच्या मिलनाचा सामान्य परिणाम निघतो ज्याला आपण म्हणतो- एक अन् एक मिळून दोन होतात एक व्यक्ती एक हजार रुपये कमावते, दुसरी व्यक्तिही एक हजार रुपये कमावते, तेव्हा सामान्य रुपाने दोघांचे धन मिळून दोन हजारच होतात.

▶ पान ६ वर

जर या परिणामापासून दूर राहू इच्छित असाल, तर थोडे सहन करावे लागेल, नुकसान सोसावे लागेल, पडती बाजू घ्यावी लागेल, स्वतःला बदलावे लागेल आणि इतकेही करू शकत नसाल तर किनारा करावा लागेल. परंतु ईर्ष्या, द्वेष, नफरत, दोषदृष्टी ठेवून स्वतःला व इतरांनाही संपवण्याचा मार्ग अवलंबू नये.

संपादकीय...

जगदंबा सरस्वती-सर्व गुणांची साक्षात मूर्ती

आजही आपण पाहतो की जगदंबा सरस्वतीची पूजा होत आहे. शाळा, कॉलेजात सरस्वतीची मूर्ती बनवून अथवा मोठे चित्र लावून मनोभावे पूजा केली जाते. लोक असे म्हणतात की सरस्वती साक्षात विद्येची देवी होत्या. परंतु त्या विद्येची देवी कशा बनल्या, त्यांच्यात कोणत्या विशेषता होत्या, याचा अनुभव ज्यांनी त्यांच्या सहवासात राहून केला, ते खरोखरच धन्य आहेत. **माता सरस्वतींना आत्मा व परमात्म्याचे ज्ञान अतिशय चांगल्याप्रकारे माहित होते तसेच त्यांनी ते पूर्णपणे आपल्या जीवनात धारण केले होते. त्यामुळे त्या ज्ञान-ज्ञानेश्वरी सरस्वती होत्या**; फलस्वरुप त्या सर्व गुणांची साक्षात मूर्ती होत्या. त्यांच्यात प्रेम, पवित्रता, मधुरता, नम्रता, गंभीरता, धैर्यता, हर्षितमुखता, अंतर्मुखता, दिव्यता हे सर्व गुण होते.

प्रेममूर्त मम्मा

अमृतसर येथील एका सिंधी धार्मिक परिवारात मम्मांचा जन्म सन १९१९ मध्ये झाला. त्यांचे बालपणीचे नाव राधा होते. राधा ही लहानपणापासूनच अतिशय हुशार व बुद्धिवान होती. सन १९३६ मध्ये, वयाच्या १७व्या वर्षी राधा आपल्या आईबरोबर 'ओम मंडळी' या सत्संगात गेली असताना, तेथे पिताश्री ब्रह्माबाबांनी जेव्हा राधेला अर्थात मम्मांना ईश्वरी ज्ञान समजावून सांगितले तेव्हा त्यांना ते अतिशय आवडले व त्याचवेळी मम्मांनी ईश्वरीय कार्यासाठी आपले जीवन समर्पण करण्याचा दृढ संकल्प केला. थोड्याच दिवसात त्यांच्या अंगी असलेल्या दैवी गुणांमुळे, पिताश्री ब्रह्माबाबांनी त्यांची नियुक्ती 'यज्ञमाता' या सर्वोच्च पदावर केली. त्या कुमारी असून देखील त्यांनी सर्व यज्ञवत्सांची तसेच हजारो ब्रह्मावत्सांची ममतामयी माता बनून अलौकिक पालना केली. ज्ञान-योगाद्वारे सर्वांचे जीवन सुशोभित केले. दैवी गुणांनी त्यांचा शृंगार केला. त्यांना महान योगी बनण्यासाठी दिव्यप्रेरणा दिली.

मम्मांनी आपल्या युवा अवस्थेत गहन तपस्या केली. त्या तपस्येचे तेज त्यांच्या चेहऱ्यावर दिसत असे. तसेच यज्ञमातेचा कारभार सांभाळताना त्यांच्या शारीरिक आकृतीत इतके आश्चर्यकारक बदल झाले की अगदी वृद्ध व्यक्तीला देखील मम्मांपासून स्वाभाविकरित्या मातेची भासना येत असे. सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणे मम्मांची लौकिक आई वृद्ध असूनही मम्माला 'मम्मा' म्हणत असे. यावरून हे स्पष्ट होते की संस्कार, स्वभाव व कर्तव्य यात बदल झाल्याने, मनुष्याचे सारे व्यक्तिमत्त्व अथवा त्याचे सारे संबंध बदलून जातात.

पिताश्री ब्रह्माबाबांची लौकिक पत्नी जशोदा माता यादेखील मम्माला 'मम्मा' म्हणत असत व मम्मांच्या गोदीत जात असत. त्या दोघांमध्ये अति मधुर संबंध होते. कारण जशोदा माता जेव्हा मम्मांना पाहात असत तेव्हा त्यांना श्रीलक्ष्मीचा साक्षात्कार होत असे. वरिष्ठ भ्राता बृजमोहनजी यांनी देखील आपल्या अनुभवात कथन केले आहे की ''मम्माने मला सदैव 'बृजमोहनजी' असे संबोधले. कधीही पत्र लिहिताना 'लाडले बृजमोहनजी' असा शब्दप्रयोग केला. पत्रात किंवा व्यक्तिगत भेटल्यावर सर्वप्रथम तब्बेतीविषयी अवश्य विचारपूस केली. खरोखर अलौकिक माता मम्मांचे प्रत्येकावर अमर्याद प्रेम होते. इतके प्रेम लौकिक मातासुद्धा आपल्या मुलावर करीत नाही.''

मम्मा जगत्माता असल्याने, सर्वांना आपल्या मुलाप्रमाणे समजत. ह्या कोणत्याही प्रकारचा भेदभाव करीत नसत. त्या कोणाचेही अवगुण मनात ठेवत नसत तसेच सर्वांविषयी सकारात्मक व कल्याणाची भावना बाळगत असत. फलस्वरूप सर्वांना मातृवत स्नेहाची अनुभूती होत असे, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे तात्कालिन मुख्य न्यायाधीश माननीय बी.पी.सिन्हा हे देखील मम्मांना भेटण्यासाठी येत असत. मम्मांना पाहून त्यांना आलौकिक मातेची ममता अनुभवाला येत असे. त्यांनी आपल्या अनुभवात असे म्हटले आहे की '**मम्मा माझी आत्मिक आई आहे. देवी आहे, शिव-शक्ती आहे.' त्यांनी कधीही मम्मांशी वाद-विवाद केला नाही. ते अतिशय प्रेमपूर्वक वार्तालाप करीत व आनंदित होऊन परतत असत.** मम्मांच्याविषयी एका कवीने सुंदर शब्दात वर्णन केले आहे...

शक्तिरूपा, सिद्धिस्वरुपा,
जगत-जननी, अंबिका।
यज्ञमाता होऊनिया,
पाळिले तू बालका।।
आरती तव गात आहे,
भक्त जन हे मंदिरी।
मातृमहिमा गावयाला
तोकडी मम वेखरी।।

पवित्रतेची मूर्ती

मातेश्वरीचे तपोबल अत्यंत उच्च स्तरीय व विशुद्ध होते. त्या रोज सकाळी २ वाजता एकांतात बसून, शिवबाबांची प्रेमभरे आठवण करीत. त्यांच्या या पुरुषार्थामुळेच त्यांच्या संपूर्ण स्वरूपाचा साक्षात्कार कित्येकांना होत असे. त्यांच्यापासून पवित्रतेची वा दिव्यतेची

किरणे सर्वत्र पसरत असल्याचा अनुभव होत असे. त्यांचे नयन स्थिर, चेहऱ्यावर प्रसन्नता व मुखमंडळावर दिव्यतेची प्रभा दृश्यमान होत असे. मातेश्वरींच्या भेटीनंतर प्रत्येकाला पवित्रतेचा आनंद व हलकेपणाचा अनुभव होत असे. मातश्वरींची आत्मिक पवित्र दृष्टी व बोल सदैव वरदानी होते. त्यांच्या मुखातून असा एकही शब्द निघाला नाही जो ज्ञानस्वरूप, प्रेमस्वरूप व योगस्वरूप नव्हता. सुरुवातीच्या काळात ईश्वरीय विश्वविद्यालयाला विरोधकांचा मोठ्या प्रमाणावर विरोध होता कारण आपल्या या ज्ञानात पवित्रतेला फार महत्व आहे. परंतु मातेश्वरीच्या संपर्कात येताच विरोधकांचा विरोध समाप्त होत असे व त्यांना असा अनुभव होत असे की मातेश्वरी साक्षात जगदंबा सरस्वती आहेत.

मातेश्वरींच्या मस्तकावर शिवबाबांची ज्ञान अमृताचा कलश ठेवला होता. त्या ज्ञानाची धारणा प्रथम त्यांनी केली व नंतर दुसऱ्यांना ज्ञान देण्यासाठी त्या निमित्त बनल्या. परंतु मातेश्वरींच्या ओठावर सदैव हेच शब्द होते की, हा 'पिता प्रसाद' आहे. पिता परमात्म्याने दिलेले ज्ञान, केवळ निमित्त बनून मी तुम्हाला देत आहे. फलस्वरूप त्यांच्या वाणीत मधुरता व संपूर्ण सत्यता अनुभवाला येत असे. त्यांच्या वाणीची मधुरता कवीने पुढील शब्दात मांडली आहे.

गोड तुझिया सुस्वरांनी,
भारल्या गेली मने।
तृप्त आत्मे जाहले,
तव मधुर वीणा वादने।
तू जणू होतीस माते,
योगेश्वराची बासरी।
मातृमहिमा गावायला,
तोकडी मम वैखरी।।

मम्मा निर्भयतेची देवी

मम्मांची दृष्टी, वृत्ती व भावना ही बेहदची होती. त्यामुळे त्यांच्यात सर्व दैवी गुणांची धारणा सहजच होत गेली. मम्मा अतिशय निर्भय होत्या. त्या कधी कुणाला घाबरत नव्हत्या, शक्तिस्वरूप होत्या. सर्व कर्मेंद्रिय त्यांच्या अधीन होती. त्यांच्यात जरासुद्धा देहअभिमान नव्हता परंतु स्वमानाचा नशा हा सर्वांपेक्षा अधिक होता. त्यांचा स्वतः वर पूर्ण विश्वास, बाबांवर पूर्ण विश्वास तसेच बाबांच्या कार्यावर पूर्ण विश्वास होता. बाबांनी एखादी गोष्ट सांगताच, मम्मा लगेचच मी गोष्ट करायला सुरुवात करीत असत. त्यांच्या प्रत्येक संकल्प व श्वासामध्ये शिवबाबा होते. मम्माच्या हृदयात सर्वांविषयी ममता होती. परंतु कोणाविषयी मोह नव्हता. सर्वांवर इतके प्रेम करूनही मम्मा निर्मोही होत्या.

मम्मांची भाषण करण्याची कला अतिशय प्रभावी व तर्कसंगत होती. त्यांना वादविवादात कोणी हरवू शकत नव्हता. मम्मा उत्तरही असे देत असे की जसा अर्जुनाचा बाण निशाणावर लागावा, एकदा कराचीचे जिल्हाधिकारी भ्राता जगतशेर जी, जे मम्मांच्या बंगल्यासमोर राहात होते. त्यांनी मम्मांना एक-दोन असंगत प्रश्न विचारले. त्यावेळी म्मांनी त्यांना असे उत्तर दिले की ते सरळ मम्मांच्या चरणाशी आले.

मम्मा जितकी ज्ञानी तू आत्मा, योगी तू आत्मा होती तितकीच शिवशक्ती माता देखील होती. मम्मा त्यागाची व सर्व गुणांची मूर्ती होत्या. **मम्मांना पाहातच बाबांनी पुढील महावाक्य उच्चारण केले होते ''ओ राधे, तुम ॐ राधे हो। हे ॐ राधे, तुम जगत अंबा हो, सबकी माँ हो।'' अशा प्रकारची मम्मांची संपूर्ण जन्मपत्रीच बाबांनी सांगितली होती. ती ऐकून उपस्थित सर्वांनाच आश्चर्य वाटले होते.**

मधुरभाषी जगदंबा

मम्मांची वाणी अतिशय मधुर, सरळ व हृदयाला भिडणारी होती. त्यांची वाणी ऐकून सर्वांचे विचार बदलून जात, येवढंच नव्हे तर कित्येकांचे जीवन बदलून जाई. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्यासारखे बनण्याची प्रेरणा होत असे. या अनुषंगाने ब्रह्माकुमारी उमा बहेन (हिमाचल प्रदेश) यांचा अनुभव फारच उद्‌बोधक आहे. सन १९६४ मध्ये जेव्हा त्यांची मम्मांशी पहिली भेट झाली, त्यावेळी त्यांचे वय केवळ १८ वर्षाचे होते. त्या मुरली ऐकण्यासाठी सेंटरवर जात असत. मम्मा अमृतसरला आल्याचे कळल्यावर उमा बहेन देखील त्यांना भेटण्यासाठी गेल्या. मम्मांची जेव्हा त्यांना दृष्टी मिळाली **तेव्हा त्यांना अनुभव आला की आपल्या आत्म्यात शक्ती भरली जात आहे मन खुशीने नाचत आहे. आपली आई आपल्याला जणू पुन्हा भेटत आहे... त्यांना रंगीत कपडे परिधान केलेल्या, वाघावर आरूढ असलेल्या जगदंबा मातेचा साक्षात्कार झाला.** बराच वेळ त्या ध्यानावस्थेतच होत्या. थोड्या वेळाने उमा बहेन ध्यानावस्थेतून खाली आल्यावर मम्मांनी त्यांना विचारले की सेवाकेंद्रावर राहशील का? त्यांना वास्तविक सेवाकेंद्रावर रहायला आवडत नव्हते. परंतु मम्मांच्या शब्दात जे आत्मिक प्रेम व मधुरता होती त्यामुळे त्या सेंटरवर रहायला आनंदाने तयार झाल्या. एवढंच नव्हे तर त्यांनी मम्मांना हे ही सांगितले की, मम्मा आपण जे सांगाल ते मी करीन. त्या दिवसापासून १५ दिवस त्या मम्मांच्या सहवासात राहिल्या. त्या कालावधीत त्यांचे संपूर्ण जीवन बदलून गेले. त्यांना या दुनियेचा विसर पडला. अलौकिक खुशी व ईश्वरीय नशेने त्यांचे जीवन बदलून गेले त्यांना या दुनियेचा विसर पडला. अलौकिक खुशी व ईश्वरी नशेने त्यांचे जीवन भरून गेले. लवकर त्या यज्ञात समर्पित झाल्या.

निरहंकारिता वा नम्रतेची मूर्ती

मम्मांची ,सर्वात मोठी विशेषता ही

होती की त्यांना भेटल्यावर अशी भासना येत असे की त्या अलौकिक मातेबरोबरच लौकिक माता देखील आहेत. त्या ईश्वरी ज्ञान तर समजावून सांगत. परंतु त्याचबरोबर लौकिक संबंधामध्ये कसा व्यवहार करावा, लौकिक मुलाकडे कुठल्या दृष्टिने पाहावे, आपले जीवन कसे सफल करावे, या सर्व गोष्टी समजावून सांगत. त्यांचा स्वभाव अतिशय निरहंकारी व विनम्र होता. त्याविषयी एक घटना नमूद कराविशी वाटते.

एकदा हजरतगंज लखनौ सेवाकेंद्रावर 'मम्मा' थांबल्या होत्या. तेव्हा त्यांना एक पत्र आले की, 'माँ, आप टेप पर कुछ महावाक्य बोल दे।' थोडावेळ विचार केल्यावर त्यांनी बाबांची एक मुरली मागवली व मुरलीतील काही महावाक्ये जशीच्या तशी वाचली. आपल्याकडून त्यात एकही शब्द घातला नाही. अशी होती मम्मांची निरहंकारिता. बाबांच्या महावाक्यांवर त्यांची अगाध निष्ठा होती.

मम्मांची असीम नम्रता दर्शविणारी एक घटना देखील आपण पाहू या. एकदा एक पत्रकार मम्मांना भेटण्यासाठी आला. तो मातृभक्तही होता. तो जेव्हा मम्मांच्या कक्षात आला तेव्हा मम्मांनी त्याला आपल्या गादीवर बसायला सांगितले. हे ऐकून तो एकदम स्तब्ध व अवाक् झाला. काय करावे हे त्याला सुचेना परंतु मातेच्या आदेशाला कोण कसे टाळू शकेल? तेव्हा अनुभव आला की माता-पिता आपल्या मुलींना किती उच्च नजरेने पाहातात!

अशा रितीने प्रत्येक आत्म्याला मम्मांपासून अवतरित देवीची भासना होत असे, जी पवित्रता व सर्व दिव्य गुणांनी संपन्न आहे व या पतित दुनियेला पावन बनविण्यासाठी अवतरित झाली आहे. त्यांच्या दृष्टीत अलौकिक जादू होती. त्यांचे व्यक्तिमत्व एखाद्या आध्यात्मिक चुंबकाप्रमाणे होते. **तात्पर्य म्हणजे मम्मा इतक्या महान होत्या की त्यांची महती वर्णन करण्यासाठी लेखणी अपुरी पडेल. अशा या सर्व गुणांची साक्षात मूर्ती असलेल्या जगदंबा मातेला त्यांच्या २४ जून रोजी असलेल्या ५१ व्या दिव्य स्मृतीदिनानिमित्त आम्हा सर्वांचे कोटी-कोटी प्रणाम!**

- ब्रह्माकुमार शिवाजी

राजयोगिनी तपस्विनी पुष्पाराणी दीदीजी

ब्र.कु. गोदावरीदीदी, प्रकाशिका अमृतकुंभ

प्राणप्रिय अव्यक्त बापदादांच्या अतिप्रिय, बेहद सेवेत उपस्थित साकार माता-पिता (मम्मा-बाबा) यांची पालना प्राप्त असलेल्या, विदर्भ क्षेत्राची सेवा सुचारु रूपाने चालविणाऱ्या, महाराष्ट्र नागपूर सबजोनच्या क्षेत्रीय संचालिका 'पुष्पाराणी दीदीजी' ज्यांनी सन १९५६ मध्ये दादी मनोहरइंद्राजी यांच्याकडून करनाल येथे ईश्वरी ज्ञान प्राप्त केले. मम्मा-बाबांच्या सन्मुख येताच त्यांनी विश्वकल्याणाच्या सेवेत, केवळ वयाच्या १४ व्या वर्षी आपले जीवन समर्पण केले. त्यांच्या सोबत त्यांची मोठी बहिण (सावित्री बहेन) व त्यांच्या मातोश्री (किशन देवी माता) या देखील समर्पित झाल्या.

आदरणीय पुष्पाराणी दीदी भारतात ठिकठिकाणी सेवा करीत सन १९७२ मध्ये नागपूर येथे पोहोचल्या व विदर्भ क्षेत्रात त्यांनी व्यापक प्रमाणात सेवा केली. वर्तमान समयी त्यांच्या निर्देशनात सुमारे ६० हजार ब्रह्मावत्स तसेच ४०० पेक्षाही अधिक समर्पित बहिणी ईश्वरीय पालना घेत होत्या. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी १२३ सेवाकेंद्रे तसेच १२५० गीता पाठशाळांचे संचालन केले. काही समयापूर्वी त्यांनी संकल्प केला होता की आपल्याला नागपूरमध्ये फार मोठे रिट्रीट सेंटर बनवायचे आहे. सध्या त्याचे निर्माण कार्य जलद गतीने चालू आहे.

अचानक मागील वर्षी त्यांना लीव्हर कँसरचा त्रास सुरू झाला. त्यावर बरेच उपचार करण्यात आले. **परंतु ड्रामाच्या भावी अनुसार दीदीजी २३ एप्रिल २०१६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता, वयाच्या ७५ व्या वर्षी दिवंगत झाल्या व अव्यक्त बापदादांच्या गोदीत विसावल्या. त्यांनी ६१ वर्षे अथकपणे अलौकिक ईश्वरी कार्य केले व आपले जीवनपुण्य खऱ्याअर्थी ईश्वरावर वाहिले. त्यांच्या पावन स्मृतीला आम्हा सर्व अमृतकुंभच्या वाचक वर्गाकडून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करीत आहे.**

■■

▶ पान २ वरून

साधारण कर्माचा परिणाम साधारणच असतो.

एक आणि एक मिळून अकरा

परंतु जेव्हा आपण म्हणतो, की एक अन् एक मिळून अकरा होतात. तेव्हा या अकरा पटींनी होणाऱ्या फायद्याचे रहस्य काय? जेव्हा दोन व्यक्तींच्या आपसातील व्यवहारामध्ये सद्गुण येतात, तेव्हा ते अकरा पटीने फायदा करतात. निःस्वार्थ स्नेह, सहयोगाच्या भावनेनी एकमेकांचे हित साधता येते. 'माझ्यापेक्षाही तू पुढे' या प्रकारचे चिंतन करताना जेव्हा कर्म केली जातात तेव्हा अशा कर्माच्या परिणामस्वरूप असीम, सुख-शांति, आनंद, प्रेम प्राप्त होते आणि समृद्धता येते, असाच एक संबंध होता- इतिहास प्रसिद्ध चंद्रगुप्त आणि चाणक्याचा! चाणक्याने चंद्रगुप्ताची प्रतिभा बालपणीच ओळखली. त्याला सम्राट बनविले तसेच देशाची निरंतर सेवा करत राहण्यासाठी ते तपस्वी स्वतः सम्राट चंद्रगुप्तचे महामंत्री बनले. कित्येक वेळा सम्राट चंद्रगुप्तास आपल्या समजदारीने संकटकालीन स्थितीतून वाचवले. स्वतः एका साधारण आश्रमात राहिले. साधारण वेशभूषेतच वावरले. राष्ट्रहित व प्रजेच्या सुख-शांतीसाठी अधिकार आणि ऐश्वर्याचा त्याग केला जेव्हा त्यांना सम्राट भेटत, महामंत्रीपेक्षा गुरूच्या रूपातच भेटत म्हणून प्रथम ते त्यांना सलाम करीत. या दोघांच्या परस्पर निःस्वार्थ संबंधाने भारताचा तो काळ त्यांनी सुवर्णकाळ बनविला. **भाव हा आहे की जेव्हा दोन निःस्वार्थ व्यक्ती कर्मठता आणि कर्तव्य परायणतेने एकमेकांशी जोडले जातात, तेव्हा त्यांच्या कर्माचा परिणाम कित्येक पटींनी वाढतो. म्हणून म्हटले आहे की, एक आणि एक अकरा होतात!**

एक आणि एक मिळून अनेक पट

कर्माच्या गतिची एक बंपर योजना आहे. जर त्या योजनेप्रमाणे काम करू तर एक अन् एक मिळून एकशे एकही होऊ शकतात. अशी कोणती योजना आहे? ही आहे ईश्वरीय योजना! जेव्हा मन-वचन-कर्मांनी पवित्र दोन मनुष्य आत्मे बिंदूरूप परमपिता परमात्म्याच्या साथीने कर्म करतात, तेव्हा त्या कर्माचे अगणित फळ मिळते. परमात्मा सर्व आत्म्यांचे पिता आहेत. म्हणून त्यांना नेहमी जवळ ठेवून किंवा त्यांच्या स्मृतीत राहून केलेल्या कर्माचे फळ सर्व मानवजातीपर्यंत पोहोचते. सांगण्यापुरते एकशे एक पट असेल! परंतु वास्तविक अशा कर्माचे फळ अगणित होते.

उदाहरणादाखल - ब्रह्माकुमारी विश्वविद्यालयाचे साकार संस्थापक पिताश्री ब्रह्माबाबा आपल्या लौकिक जीवनात दादा लेखराज सुप्रसिद्ध जवाहरी होते. हिऱ्यांच्या व्यापारात त्यांना खूपच चांगली कमाई होती ते दानपुण्यही करीत. परंतु इतर जवाहऱ्यांप्रमाणे ते एक सामान्य जवाहरी होते. जेव्हा निराकार परमपिता शिवाच्या उपदेशाप्रमाणे त्यांनी आपले सर्वस्व ईश्वरीय सेवेत लावले. तेव्हा ते एक सामान्य व्यक्ती न राहता, नवसृष्टी रचयिता प्रजापिता ब्रह्मांचे पद प्राप्त करू शकले. स्वतःच्या लौकिक मुलांच्या संगोपनाच्या जागी सर्व विश्वातील आत्म्यांचे ते आध्यात्मिक संगोपनकर्ता झाले. मुखवंशावली मुलांसाठी अहोरात्र सेवा करताना त्यांनी निराकार ज्योतिर्बिंदू परमात्मा शिवच माझ्याद्वारे सेवा करित आहे, हीच भावना ठेवली. दृढ निमित्त भावाने स्वतःच स्वतःला पडद्याआड ठेवले आणि सतत हेच म्हटले की, 'मी सुद्धा एक निराकार शिवाची संतान आहे, तुम्हीही त्या निराकार शिवबाबांचीच आठवण करा.' अशा प्रकारे ब्रह्माबाबा परमपिता परमात्म्याला आपले प्रत्येक कर्म समर्पित करून कर्माच्या बंधनातून पूर्णतः मुक्त झाले, कर्मातीत बनले.

आज पाचही महाद्विपांमधील लाखो लोक त्यांच्या कर्माने प्रेरित आहेत. त्यांच्या कर्मकहाणीत आपल्या जीवनातील अनेक प्रश्नांची उत्तरे प्राप्त होतात. फक्त ३३ वर्षाच्या साधनेने त्यांना भविष्यातील नवीन दुनियेत श्री नारायण पदाचे अधिकारी बनविले. कारण हेच की त्यांच्या कर्माचे फळ अकरा पट किंवा शंभर पटीने नाही तर अगणित पटींनी बनत राहिले. **आम्हीही जर आमच्या कर्मांना परमात्मा शिव पित्याच्या स्मृतीत केले; निमित्त भावाने केले; आत्मिक स्थितीत स्थित होऊन केले तर एकाचे अनेक पटींनी फळ प्राप्त करू शकतो. म्हणूनच संगमयुगातील हे ईश्वरीय गणित सदैव लक्षात ठेवा.**

- संदर्भ, अमृत संग्रह (भाग २)

(भावानुवाद : ब्र.कु मीनाक्षी बहेन, ठाणे पू.)

▪▪

राजयोगाचे सहज स्वरूप

- ब्र.कु. सूर्य, शांतिवन (आबू रोड)

जसजसे आपण ज्ञानमार्गात पुढे जात आहोत, आपल्या कल्प पूर्वीच्या स्मृती जागृत होत आहेत आणि एक दिवशी आपण अवश्य स्मृतिस्वरूप बनू. त्यावेळी आपल्याला योगी बनण्यासाठी अभ्यास करण्याची आवश्यकता राहणार नाही, परंतु आपण योगाचे स्वरूप बनू. जितके आपल्याला अधिक वास्तविक स्वरूपाचे भान होत आहे; योग आपल्यासाठी सहज होत चालला आहे. खरं तर योग एक स्मृती अथवा भान आहे.

आपण जर विचार केला तर एकीकडे गोप-गोपी ज्यांनी तपस्या केली नव्हती, ध्यान केले नव्हते, त्याग वा संन्यास केला नव्हता, दुसरीकडे ते ऋषी-मुनी ज्यांनी कठीण तपस्या केली होती, मनाला मारले होते, कित्येक वर्षे जंगलात राहीले होते, एकाग्रतेसाठी अनेक सिद्धी प्राप्त केल्या होत्या. परंतु या दोन्हींच्या मध्ये महान कोण? परम सौभाग्यशाली कोण? कोणाचा मार्ग सरळ आहे? कोणाला श्रेष्ठ प्राप्ती झाल्या? 'जे प्रभुप्रेमात लवलीन झाले होते. ज्यांनी आपल्या हृदयात ईश्वराला बसवले होते. ज्यांनी आपले सर्वस्व भगवंताला समर्पित केले होते.' **अशा रितीने आपण देखील योगाला सरळ रूप देवूया. आपण देखील निःसंदेह गोप-गोपी आहोत. भगवान आपला साथी आहे. परमात्म्याचे प्रत्येक दिव्य कर्तव्य आपण जवळून पाहत आहोत. अशा प्रकारचे चिंतन केल्याने आपल्याला अनेक ईश्वरी शक्ती वरदानाच्या रूपाने प्राप्त होतील.** म्हणूनच आपण आपल्या वास्तविक स्वरूपाला जाणू या व एक परमात्म्यालाच आपले सर्वस्व मानू या. आपल्या जीवनात हा नशा स्थायी असला पाहिजे की आपले संबंध व संपर्क आता कोणाशी आहे?

मी कोण?

केवळ हे जाणणे पर्याप्त नाही की मी या देहापासून भिन्न चैतन्य आत्मा आहे परंतु मी महान आत्मा आहे, ही स्मृती सदैव असली पाहिजे. सृष्टीच्या आदिपासून अंतापर्यंत मी हिरो-हिरॉईनची भूमिका बजावली आहे. ही स्मृती वा भान जर असेल तर आपली आत्मिक स्थिती सहज रूप घेत जाईल; आपल्याला हा ईश्वरी नशा चढत जाईल की मी तोच देव आत्मा आहे ज्याच्याकडे भक्त मंदिरात वरदानाची याचना करीत आहेत. जसजसे या सृष्टिचक्रातील स्वतःचे महत्त्व आपल्याला ज्ञात होत जाईल, तसतसे आपले जीवन महानतेनी ओतप्रोत होत जाईल. जितकी स्वतःच्या महानतेची जाणिव आपल्याला होत जाईल, मी पणा दूर होत जाईल. म्हणूनच मी कोण आहे? याचे चिंतन प्रत्येक राजयोगीला एकांतात बसून केले पाहिजे.

माझा पिता कोण?

जरा विचार करा की, आपण कोणाची मुले आहोत? आपल्या मागे कोण आहे? या जगात एका पंतप्रधानाच्या मुलाला किती नशा असतो. त्याचे बोलणे-चालणे, त्याच्या प्रत्येक कर्मात तो नशा दिसून येतो. त्याच्या मनात हाच विचार असतो की माझा पिता कोण? माझ्या मागे कोण आहे? अशाप्रकारे आपला हा नशा देखील चढत गेला पाहिजे की आपण कोणाची मुले आहोत, स्वयं शिव परमात्मा आपला पारलौकिक पिता आहे. हा नशा आपल्या जीवन परिवर्तनाचा आधार बनेल. माझा पिता तोच आहे ज्याच्या केवळ दर्शनासाठी भक्त मंदिरात तिष्ठत उभे आहेत. माझा परमपिता तोच आहे ज्याच्या भेटीसाठी मोठे-मोठे ऋषि घोर तपस्या करीत आहेत. आता तोच माझा परमपिता माझ्या सोबत आहे. एवढंच नाही तर तो माझ्या हृदयात निवास करीत आहे.

माझा परम शिक्षक कोण?

जरा विचार करा की आपल्याला रोज शिकविणारा कोण? लोक ज्याला सर्वत्र शोधून हारले आहेत; ज्याचा आवाज ऐकण्यासाठी लोकांनी कठीण प्रयास केले, त्याच्याच मधुर वाणीने आपल्या कानांना मधुर बनविले आहे. जी रहस्ये मोठे-मोठे विज्ञान जाणू शकले नाहीत ती सर्व

रहस्ये परम शिक्षक परमात्म्याने आपल्याला अगदी सहज, हसत-खेळत समजावून सांगितली. ज्या रहस्यांविषयी महारथी आयुष्यभर शास्त्रांचा अर्थ काढत बसले ती रहस्ये अतिशय सहजपणे स्पष्ट करून सांगितली. त्यामुळे जरा विचार करा की आपण कोणाचे विद्यार्थी आहोत. त्या सर्वोच्च ज्ञानदात्याने आपल्याला सत्यगीता ज्ञानाची अथॉरिटी दिली आहे. जो आपल्याला शिकवित आहे तोच ज्ञानाचा सागर, पतितपावन, दुःखहर्ता, सुखकर्ता, त्रिकालदर्शी आहे. अशा परमशिक्षक परमात्म्याची आठवण आपल्याला सदैव असली पाहिजे. या दुनियेत एखाद्याने पी.एच. डी. ची डिग्री प्राप्त केली तर त्याचे पाय जमीनीला टेकत नाहीत. तसेच आपल्याला देखील सर्वोच्च डिग्री प्राप्त आहे, हा नशा आत्म्याला बलवान बनवतो.

माझा परम सद्गुरू कोण?

या दुनियेत कित्येकांना याचा मोठा अभियान असतो की मी अमुक-अमुक गुरुंचा शिष्य आहे. माझे गुरु सिद्ध पुरुष आहेत. परंतु हे ब्रह्मावत्सांनो, तुम्हाला कोणी आपली शरण दिली आहे? जो सर्वांचा मार्गदर्शक, मुक्तिदाता, भाग्यविधाता आहे. तो स्वयं तुमचा सद्गुरू आहे. तोच सर्व गुरुंचा देखील उद्धार करतो. त्यानेच तुम्हाला बंधनमुक्त बनवले, मुक्ती व जीवनमुक्ती (अर्थात स्वर्गाचा) आभास करविला. तुम्हाला याचा किती गौरव असला पाहिजे की शेवटी ज्याला शरण येण्यासाठी सर्व गुरू धावत येतील त्या सद्गुरूचा हात तुमच्या मस्तकावर आहे. त्याने तुम्हाला इतक्या स्पष्टपणे पथ प्रदर्शन केले आहे की तुम्हाला कुठलीच बाधा येणार नाही. अशा प्रकारचा श्रेष्ठ ईश्वरी नशा परमपूज्य सद्गुरू शिवबाबांची आठवण सदैव देत असतो. त्यांच्या श्रीमताच्या आधारेच आपले सर्वांचे कल्याण निश्चितच होणार आहे.

माझे परम प्रियतम कोण?

कधी ऋषि-मुनि देखील त्या गोपींच्या भाग्याची ईर्ष्या करीत असतील, ज्यांनी प्रत्यक्ष परमात्म्याला आपला प्रियतम म्हणून स्वीकार केला, ज्यांनी केवळ एकालाच आपल्या मनमंदिरात बसवले. ज्याची महिमा वर्णन करताना अनेक भक्त मोठ्या प्रेमाने गीत गातात, भावविभोर होऊन तल्लीन होतात. तो आता आपला आहे. जेव्हा एखाद्या कन्येचा विवाह एखाद्या रुपवान, धनवान व विद्वान पतीशी होतो तेव्हा तिचा आनंद गगनात मावेनासा होतो. आपण आत्म्यांनी तर परमप्रियतम परमात्म्याला वरले आहे जो पतिचाही पति आहे, आत्म्यांचा खरा सहारा आहे, त्याच्या आठवणीशिवाय अन्य कोणाची आठवण करणे, हे पतिव्रतेचे लक्षण नाही. वास्तविक परमात्म्यापेक्षा अधिक रुपवान, गुणवान धनवान, विद्यावान, बलवान कोणीही नाही. त्यामुळे आत्मारूपी प्रियतमाला आपल्या परमप्रिय प्रियतमचा किती नशा असला पाहिजे तो जरी निराकार असला तरी आपली सर्व अनुभूती साकार मध्येच करवतो. त्यामुळे आपण स्वप्नात सुद्धा कुणाची आठवण करता कामा नये. आपण त्याच्यावर इतके प्रेम केले पाहिजे की त्याच्याशिवाय अन्य दुसरं काहीही दृष्टीस पडता कामा नये.

माझा परम मित्र कोण?

खरा मित्र तोच जो आपल्याला संकटाच्या वेळी मदत करतो. आपले अश्रू पुसतो, वेळेवर आपल्याला सहारा देतो. वास्तविक परमात्माच आपला खरा मित्र आहे. त्याच्याशी मित्रता निभवायची आहे. त्या मित्राशी केलेले वायदे पूर्ण करायचे आहेत. सदैव त्या मित्राच्या सहवासात रहायचे आहे. त्या परमहितैषी मित्राला कधीही विसरायचे नाही. त्याच्यापासून दूर जायचे नाही. त्याच्याशी मित्रता वाढवायची आहे. प्रत्येक कार्य करताना त्याच्या सोबतीचा अनुभव करायचा आहे.

माझा रक्षक कोण?

स्वयं सर्व शक्तिवान ज्याच्या इशाऱ्याने असुर मैदान सोडून पळत सुटतात, ज्याच्या केवळ दृष्टीने पापी लोकांचा थरकाप होतो, अशा सर्व समर्थ, सर्व शक्तिवान परमात्म्याची 'छत्रछाया' आपल्यावर आहे ही स्मृती आपल्याला निर्भय बनवते. परंतु जेव्हा आपण परम रक्षक परमात्म्याला विसरतो तेव्हा भयभीत होतो. आपण सर्वजण हे जाणतो की त्याच्या छत्रछायेत पांडवांची सदैव रक्षा झाली. पांडव कधीही भुके राहिले नाहीत. मग आपणही त्याच्या छत्रछायेखाली असताना आपले अहित कसे होईल? **अशा प्रकारची सर्व संबंधांची स्मृती आपल्या जीवनाला ईश्वरी नशेने ओतप्रोत करते. फलस्वरूप योगाचा अभ्यास हा अति सहज होतो. कारण ईश्वरी आठवण आपल्या मनात सदैव सामावलेली असते.** मन आपोआपच शांत राहते. त्यामुळे आपल्याला पुन्हा-पुन्हा कठीण तपस्या करण्याची आवश्यकता राहत नाही, हेच आहे राजयोगाचे सहज स्वरूप. समयानुसार अशी ही सर्वोत्तम लवलीन स्थिती प्रत्येक ब्रह्मावत्साला अनुभवता आली पाहिजे. हाच भाव पुढील काव्य पंक्तीतून व्यक्त केला आहे.

तुम हमारे, हम तुम्हारे हो गये।
बाबा, तेरे प्यारमें हम खो गये।।

(संदर्भ:- राजयोग अमृतधारा)
(भावानुवाद : बी.के.चंद्रशेखर, शांतिवन)■■

राजयोगाची विधी आणि प्राप्ती

ब्र.कु. प्रकाश तलाठी, विलेपार्ले (मुंबई)

राजयोग सर्व योगांचा राजा आहे. त्यामध्ये ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग, हठयोग असे सर्व योग सामावलेले आहेत. राजयोगाची विधी पुढीलप्रमाणे आहे- सर्व शरीरधारी संबंधी, संपर्कामधील व्यक्ती, वस्तू-वैभव-संपत्ती वगैरे सर्व काही विसरून तसेच स्वतःच्या शरीरालासुद्धा विसरून बाकी राहिलेला फक्त आत्मा - तो म्हणजेच मी स्वतः हे जाणून त्या आत्मिक स्थितीमध्ये स्थिर राहणे. नंतर परमपिता शिवबाबांच्या आठवणीत राहणे - सारांश रूपात शिवबाबा सांगतात- 'माम् एकम् (केवळ मला एकट्यालाच) याद करो।' गीतेमध्ये केवळ एका शब्दात सांगितले आहे - 'मन्मनाभव.' स्वतःच्या चंचल भटकणाऱ्या मनाला माझ्यामध्ये गुंतव आणि तसाच (स्थिर) राहा. त्यापासून होणारी प्राप्तीदेखील अशीच एका शब्दात सांगण्यात आली आहे- 'मध्याजी भव' त्रिमूर्तिमध्ये मध्यभागी आहे विष्णु. मध्याजी भव अर्थात विष्णुपुरी वा वैकुंठपुरीला प्राप्त करणे; स्वर्गप्राप्ती किंबहुना स्वर्गाचे राज्य वर्सा म्हणून मिळणे. हीच राजयोगाची विधी अशी देखील सांगता येईल.

- **LOCATE the Source**
- **CONNECT to the Source**
- **RELATE with the source**
- **RADIATE like the Source**

• *LOCATE :*

गुणांचा, शक्तींचा, ज्ञानाचा (विशेषतः कसब आणि TALENT) जो स्रोत आहे त्याला शोधून काढा. तो कोण आहे, कसा आहे, कोठे आहे, कधी भेटू शकतो आदी आदी इत्थंभूत आणि यथार्थ (Accurate) माहिती मिळवा.

• *CONNECT :*

म्हणजे जुळवणे, जोडणे अर्थात योग. अचानक जुळून येणे म्हणजे योगायोग. आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे प्रत्येक गुण ही शक्ती आहे. ज्ञान ही सुद्धा शक्ती आहे. आणि सर्व शक्तिमानाच्या शक्ती यासुद्धा शक्तीच आहेत. म्हणजेच परमात्मा हा एक शक्तिबिंदू (energy point) आहे. म्हणून त्याच्या महिमेला सूर्य या शब्दाची जोड दिली जाते. उदाहरणार्थ, ज्ञानसूर्य, सत्याचा सूर्य, पवित्रतेचा सूर्य आदी, आदी. अशा जिवंत (Live Point) शक्तिशाली तारेला जर दुसरी साधारण तार जोडली तर शक्तिशाली प्रवाह वाहू लागेल. दोन तारा जोडण्यासाठी प्रथम त्यांच्यावरील आवरण (Insulation) काढावे लागते. परमात्मा ही एक Live Wire आहे. त्यावर कुठलेही आवरण (कोटींग) नाही. परंतु आत्म्यावरील आवरण काढल्याशिवाय या तारा जोडल्या जाऊ शकत नाहीत आणि शक्तिशाली शक्तीचा प्रवाह वाहू शकत नाही. म्हणून देहाचे आवरण उतरवून आत्म्याने सर्व देहधारी, वस्तू वैभवामधून आपले लक्ष काढून एकाग्रतेने स्वतःला परमपिता परमात्मा शिव या निराकारी ज्योतिर्बिंदूबरोबर जोडणे आवश्यक आहे. जशी सेलफोनची बॅटरी डिसचार्ज झाल्यावर तिला चार्ज करण्याची गरज असते तशी आत्मारूपी बॅटरी डिसचार्ज होते तेव्हा सर्वशक्तिमान परमात्मा ही बॅटरी Fully charge करतो. ज्याला सत्त्वप्रधान स्थिती म्हणता येईल. नंतर जन्ममरणाच्या अंतिम चरणात ती जवळजवळ संपूर्णपणे डिसचार्ज होते, अर्थात तमोप्रधान बनते. जोडण्याची प्रक्रिया आवश्यक आहे. चार्जिंग पॉईंट परमात्मा आणि आत्मा हे दोन्ही एकाच आकाराचे बिंदू असतात. कोणी लहान नाही वा मोठा नाही. परंतु परमात्मा सदैव Fully charged असतो. कधीच

आत्मा ही एक लोखंडी तार आहे आणि परमात्मा हा एक शक्तिशाली चुंबक आहे. जन्ममरणाच्या चक्रात फिरतफिरत या तारेवर द्वापारयुगापासून गंज चढू लागतो. या गंजामुळे तार चुंबकाकडे वेगाने खेचली जात नाही. गंज चुंबकीय शक्तीला अवरोध करतो. गंज काढून टाकण्याची आवश्यकता भासते.



डिसचार्ज होत नाही. तो हजारो सूर्यासमान तेजोमय असतो हा एक चुकीचा समज आहे.

दुसरे रूपक पाहा - आत्मा ही एक लोखंडी तार आहे आणि परमात्मा हा एक शक्तिशाली चुंबक आहे. जन्ममरणाच्या चक्रात फिरतफिरत या तारेवर द्वापारयुगापासून गंज चढू लागतो. या गंजामुळे तार चुंबकाकडे वेगाने खेचली जात नाही. गंज चुंबकीय शक्तीला अवरोध करतो. गंज काढून टाकण्याची आवश्यकता भासते. गंज काढण्यासाठी तार केरोसिनमध्ये टाकावी लागते. येथे आत्मा - तार, गंज - विकार आणि केरोसिन आहे परमात्म्याची प्रेमभरी आठवण अर्थात योग. जितका जास्ती योग तितका गंज उतरत जातो, तेवढ्या सहजतेने तार चुंबकाकडे खेचली जाते, पवित्रता वाढीला लागते. सुरुवातीला गंज जास्त असल्यामुळे एकाग्रचित्त योग राहू शकत नाही. त्यामुळे नाराज होण्याचे कारण नाही. योगाची कास धरून ठेवणे, योगाचा जास्तीतजास्त अभ्यासी बनणे हाच एकमेव उपाय आहे. आपली आंतरिक तीव्र इच्छा पाहून पितादेखील पुत्राच्या मदतीला येतो आणि योगाचे सहजयोगामध्ये रूपांतर होते. आपल्या प्रेमाच्या तीव्र शक्तीमुळे मेहनत ही मेहनत वाटत नाही, मौज वाटते. म्हणून म्हणतात, मुहब्बत में मेहनत नहीं। "There is no labour in love' प्रभु प्रेमाचा भुकेला. 'आपल्या प्रेमाच्या रेशीम धाग्यामध्ये आपण साक्षात परमात्म्याला बांधून ठेवू शकतो.'

योगामध्ये प्रेमभावनेला फार महत्त्व आहे. आपल्या साधुसंतांनीसुद्धा हे ओळखले व सांगितले आहे. 'देव प्रेमाचा भुकेला' त्याच्यावर प्रेम करा, तो तुमच्यासाठी काहीही करेल. ही चावी आहे सर्व प्राप्तीची. परंतु प्रेम म्हणजे काय?

आज 'प्रिये मी तुझ्याशिवाय जगू शकत नाही' आणि उद्या 'तू माझे जगणे मुश्किल करून टाकलेस!' अशी स्थिती आहे.

आज प्रेम आणि उद्या जर प्रेमाला नकार मिळाला तर ॲसिड बल्ब किंवा सुरी हल्ला. ज्याच्यावर प्रेम करतो ते नष्ट करण्याची कल्पना, जन्म तरी कशी घेऊ शकते? त्याग-समर्पण भावना कोठे गायब झाल्या? शारीरिक प्रेमामध्ये विकारांचा प्रादूर्भाव असतो. स्वार्थ, शारीरिक आकर्षण, मोह, परावलंबित्त्व यांपैकी कोणत्या ना कोणत्या विकारांचा अंश जरूर असतो. विकारी प्रेम विशुद्ध प्रेम होऊच शकत नाही. संबंधातील प्रेम नात्यांप्रमाणे रंग बदलत जाते. आई-मूल, प्रियकर-प्रेयसी, दोस्त, भाऊ-बहीण, प्रत्येक प्रेमाची प्रत वेगळी! **विशुद्ध प्रेमभावना असते आत्मिक प्रेमात, शारीरिक नव्हे. त्यामध्ये त्याग, समर्पण, मान, आदर इत्यादी भावना समाविष्ट असतात. म्हणजे शुद्ध गुणांची पॉझिटिव्ह एनर्जी असते.** त्यात विकारांची निगेटिव्ह एनर्जी नसते. ते पांगळे बनवणारे, बंधने घालणारे नसते. एकमेकांच्या प्रगतीला वाव देणारे असते. म्हणून हे विशुद्ध प्रेम; हे प्रेम एकमेकांना आधार देणारे असते. विशुद्ध प्रेम अचानक उत्पन्न होत नाही. प्रथमदर्शनी प्रेमामध्ये देह आकर्षणाचा प्रभाव असतो. Never love the stranger असे म्हटले जाते. अनोळखी व्यक्तीवर प्रेम करू नका असा सल्ला दिला जातो.

साधारणतः प्रेमाचा प्रादूर्भाव तीन 'ए' व एक 'आर' यामुळे होतो.

१) पहिले 'ए' म्हणजे Acceptance (स्वीकार). ज्याच्यावर प्रेम जडते त्याला तो जसा आहे तसा गुणांदोषांसह स्वीकार करणे. प्रेमापोटी दोष, त्रुटी, स्वभावातले कंगोरे, वाईट संस्कार इत्यादी गोष्टी असूनही त्या व्यक्तीचा जाणीवपूर्वक स्वीकार केला जातो. नंतरही ते दोष घालवून टाकण्यासाठी भांडणतंटा, त्रागा आदी हत्यारे न वापरता गुणांची वाहवा करून नंतरच दोषाबाबत प्रेमाने समजावणे किंवा काहीही न बोलता स्वतः उदाहरणमूर्त बनून त्यापासूनचे फायदे किंवा त्यापासून मिळणारे सुख-आनंद मौज लुटणे. ज्याचा पक्का परिणाम त्या व्यक्तीला अंतर्मुखी बनून स्वतःमध्ये बदल घडवून आणण्यास प्रवृत्त करतो. हा मार्ग धीर, सहनशीलता, उमेद राखून ठेवणे तसेच शुभभावना बाळगणे या स्टेशनांवरून जातो.

'बाबा, मैं जो हूँ, जैसा हूँ, आपका हूँ।'

जेव्हा कोणाकडून आपणास काही प्राप्ती होणार असते, भेटवस्तू मिळते किंवा उत्पन्नाचे साधन, आरामाचे साधन प्राप्त होणार असते, त्या व्यक्तिबद्दल काहीही नातेसंबंध नसतानासुद्धा स्नेह उत्पन्न होतो. परमपिता शिवबाबा आपल्या मुलांना अनेक खजिन्यांचे मालक बनवतात.

परमपिता परमात्मासुद्धा आपला, आपण जे आहोत, जसे आहोत तसा स्वीकार करतो. तो असे म्हणत नाही की, 'बाबा रे, तू पापी आहेस. तू माझ्या मंदिराची पायरीसुद्धा चढू नकोस. आपला विनाअट, सहर्ष स्वीकार हे त्याचे प्रेम आहे. आपण कसे आहोत हे प्रत्येक जण जाणतोच. क्वचित आपणही आपला स्वीकार करू शकण्यास धजावू शकत नाही. म्हणून त्याच्या प्रेमाची महत्ता आपण जाणू शकतो आणि त्यामुळे उत्स्फूर्तपणे त्याला प्रतिसाद देणे हे आपले कर्तव्यच बनते. किंबहूना तशी गरजच भासते.'

२) दुसरा 'ए' म्हणजे Appreciation (कौतुक). जेव्हा एखादी व्यक्ती आपल्यामधील केवळ दोषच पाहते, टीका करते, इतरांना सांगून त्यांचे मन कलुषित करते, अशा व्यक्तीवर प्रेम करणे सहज शक्य आहे काय? भले विद्वान, साधू-संत म्हणतात- 'निंदकाचे घर असावे शेजारी' हा विचार बुद्धीला पटला तरी प्रत्यक्षात त्यांच्यावर प्रेम?

उलटपक्षी एखादी व्यक्ती आपले सतत कौतुक करते. अगदी लहानसहान गोष्टींबाबतसुद्धा मनापासून वाहवा करते. त्याचा प्रामाणिक भाव आपल्याला जाणवतो सुद्धा! समजा, ती व्यक्ती तुमच्या ऑफिसमधील साहेब आहे. वेळोवेळी तो तुम्हाला पगारवाढ, बोनस किंवा प्रमोशनसुद्धा देत असेल तर त्या व्यक्तिबद्दल तुम्ही तुमच्या घरी, चारचौघात किती आपलेपणाने, कौतुकाने बोलता. त्याला पार्टीला आमंत्रित करता. जेणेकरून स्नेह वृद्धिंगत होत जाईल.

परमात्मा शिवबाबासुद्धा (मुरलीच्या माध्यमातून) सदैव आपल्या मुलांचे किती कौतुक करतो! कधीकधी ते अवाजवीसुद्धा वाटू लागते. परंतु तो त्यातील सत्यता आपल्याला पटवून देतो. आपल्या महिमांचे, कौतुकांचे हार आपल्या गळ्यात घालतो. स्वतः निरअहंकारी, निर्माण असून आपल्याला किती मानशान देतो. 'मीठे बच्चे, मीठे बच्चे' म्हणून आपल्या नावाचे स्मरण करतो. 'वाह बच्चे, वाह!' अशी कौतुकाची थाप देतो. ही त्याच्या प्रेमाची निशाणी नव्हे काय? आपणही - 'वाह, बाबा वाह!', 'वाह, ड्रामा वाह!!' 'वाह, ईश्वरीय परिवार वाह!!!' म्हणून प्रतिसाद देतो.

३) तिसरा 'ए' म्हणजे Attainment (प्राप्ती). जेव्हा कोणाकडून आपणास काही प्राप्ती होणार असते, भेटवस्तू मिळते किंवा उत्पन्नाचे साधन, आरामाचे साधन प्राप्त होणार असते, त्या व्यक्तिबद्दल काहीही नातेसंबंध नसतानासुद्धा स्नेह उत्पन्न होतो. परमपिता शिवबाबा आपल्या मुलांना अनेक खजिन्यांचे मालक बनवतात. त्यांचा सद्गुणांनी, ज्ञानरत्नांनी शृंगार करतात. सर्वशक्तिमान सर्व शक्तींनी संपन्न करतात. खुशीचा खजिना, कल्याणकारी संगमयुगाच्या समयाचा खजिना, श्रेष्ठ संकल्पांचा खजिना, सर्व गुणांचा, सर्व शक्तींचा खजिना, ज्ञानरत्नांचा खजिना, दुवांचा-सद्भावाचा खजिना, परमात्म वरदानांचा खजिना आदी अनेक खजिने पिता आपल्या पुत्रांना देतो. 'अप्राप्त नही कोई वस्तू ब्राह्मणों के खजानों में।' अशी स्थिती होते. त्याचा वरदहस्त डोक्यावर असल्याचा प्रत्यय सतत येत राहतो. दिव्य दृष्टी, दिव्य नेत्र, सद्बुद्धी देतो. २१ जन्मांसाठी अविनाशी वारसा देतो. दाता-वरदाता-भाग्यविधाता सर्व प्राप्तीची अविनाशी, अखंड खाण!, 'पाना था सो पा लिया, अब और क्या बाकी रहा' अशी परिस्थिती होते. केवळ 'वाह, बाबा वाह! शुक्रिया!!' हे गीत मनाच्या अंतरात अविरत चालू राहते.

तीन 'ए' (Acceptance, Appreciation, Attainment) नंतर आता राहिला एक 'आर'.

४) एक 'आर' म्हणजे Relationship (संबंध) संबंधातून प्रेम. 'तो' आणि 'ती' शहरामध्ये कधी बाजारात, कधी बसस्टॉपवर, कधी बँकेत, पोस्टात अचानक भेटतात. परंतु एकमेकांस अनोळखी असतात. प्रेमाचा प्रश्नच नसतो. परंतु योगायोगाने जर त्यांचे लग्न ठरले तर त्या क्षणापासून लग्नसोहळा झालेला नसतानासुद्धा एकमेकांप्रती प्रेम उत्पन्न होते. प्रेम वाहू लागते.

प्रेम कोणी पाहिले आहे काय? मी तो भाग्यवान आहे ज्याने प्रेमाच्या धारांचा वर्षाव होताना पाहिले आहे. माझ्या मुलीला पहिली मुलगी झाली. एके दिवशी ती आपल्या नवजात

मायलेक! मातेमध्ये अनेक गुण असतात. ती सर्जनशील असते, ती काळजी घेणारी आणि संभाळ करणारी असते. तिच्या प्रेमाला उपमा नाही, ती सदैव पाठीशी उभी राहते, सहनशीलता, संयम, सांभाळून घेण्याची वृत्ती, विश्वास धैर्यशीलता, दया-क्षमा-शांती-त्याग आदी अनेक गुण असतात.

मुलीला मांडीवर घेऊन बसली होती. तिच्याकडे अत्यंत प्रेमाने एकटक पाहत होती. तिच्या डोळ्यातून प्रेमाच्या अमृतधारा मुलीवर बरसत होत्या. तिला संपूर्ण जगाचा विसर पडला होता. आणि मी त्या स्वर्गीय मीलनाचा एकमेव साक्षीदार होतो. माझी नात- रीया ही माझ्या मुलीच्या जीवनात प्रथमच आली. काहीही पूर्व परिचय नाही. परंतु प्रेमाचा वर्षाव किती शक्तिशाली होता. नात्यामध्ये प्रेम उत्पन्न करण्याची ताकद असते.

आपण एखाद्या गगनचुंबी इमारतीमध्ये अथवा एखाद्या छोट्याशा अपार्टमेंटमध्ये फिरलो तरी आपल्या लक्षात येईल की किचन, बाथरूम, बाग, गॅरेज जेथे नळ असतो तेथे नळ चालू करताच पाणी वाहू लागते. कारण काय? प्रत्येक नळ हा त्या इमारतीच्या वर असलेल्या पाण्याच्या टाकीला जोडलेला असतो. पाण्याच्या टाकीत ज्या दर्जाचे (स्वच्छ, गढूळ, रंगीत) पाणी असते तेच पाणी नळाद्वारे वाहू लागते. तद्वत जर प्रत्येक आत्मा एखाद्या नळाप्रमाणे अतिशय उंच असलेल्या त्या सागराबरोबर जोडला (योग) तर सागराच्या पाण्याच्या लाटांवर लाटा येऊन तो आत्मादेखील सागरासमान होईल. परमात्मा शांतीचा सागर, प्रेमाचा सागर, सुखाचा सागर... गुणांचा सागर तद्वत आत्मा शांतस्वरूप, प्रेमस्वरूप, सुखस्वरूप...दैवी गुणमूर्त बनेल.

• *RELATE* (संबंध जोडणे):

वेगवेगळ्या संबंधाद्वारे परमात्म्याकडून आपण भरपूर प्राप्ती करून घेऊ शकतो. पूर्वी 'त्वमेव माता पिता त्वमेव' हेही फक्त आरतीमध्ये हात जोडून अधिकाधिक लाभ घेणे सहज शक्य झाले होते. प्रत्येक संबंधाचे प्रेम वेगळे, त्यातून लाभणारे सुखही वेगळे असते. प्रत्येक संबंधात वेगवेगळे गुण वापरले जातात. त्यामुळे सर्व गुणांची प्राप्ती होते. उदाहरणार्थ, मायलेक! मातेमध्ये अनेक गुण असतात. ती सर्जनशील असते, ती काळजी घेणारी आणि संभाळ करणारी असते. तिच्या प्रेमाला उपमा नाही, ती सदैव पाठीशी उभी राहते, सहनशीलता, संयम, सांभाळून घेण्याची वृत्ती, विश्वास धैर्यशीलता, दया-क्षमा-शांती-त्याग आदी अनेक गुण असतात. परमेश्वर जेव्हा आईच्या रूपात हे गुण आपल्यावर उधळतो तेव्हा आपल्याला मुलाच्या रूपात आज्ञाधारकपणा, शिस्तपालन, सुशील स्वभाव, नम्रता, विनय, मिठास आदी गुण धारण करणे आवश्यक होते. तसेच साजन-सजनी, दोस्त, शिक्षक-विद्यार्थी, सद्गुरू-चेला, बाप-बेटा, भाऊ-बहीण आदी... प्रत्येक संबंध जोडणे व तसे त्याच्याबरोबर Relate करणे, संबंध वृद्धिंगत करणे आवश्यक आहे. कोणत्याही संबंधासाठी कोणी देहधारी आठवायला नको, हे त्याचे मर्म आहे. शिवाय त्याच्याइतका उत्कृष्ट संबंध दुसरा कोणी निभावणार नाही, त्याच्याइतके संबंधातील सुख, आनंद, प्रेम इतरत्र लाभणार नाही. उलट इतरत्र संबंधाचे बंधनामध्ये रूपांतर होते आणि बंधनात स्वातंत्र्य गमावले जाते, दुःख वाट्याला येते.

• *RADIATE* (पसरविणे) :

साक्षात (ज्ञान) सूर्याबरोबर संबंध जोडल्यावर आत्मरूपी बॅटरी जसजशी चार्ज होत जाते तसतशी त्याची प्रभा वृद्धिंगत होत जाते. म्हणून योगीराज किंवा तपस्या, साधना करणारे ऋषि-मुनी, साधू-संत, धर्मस्थापक, देवी-देवता यांच्या मस्तकाभोवती एक प्रकाशाचे अर्धवर्तुळ दाखवण्यात येते. त्यांचे ते प्रसन्न व्यक्तिमत्त्व आनंदाची, पावित्र्याची ऊर्जा दर्शकाला देत राहते. म्हणून तर सामान्य माणूस खास त्यांच्या दर्शनासाठी तासन्तास उन्हा-पावसात, डोंगर-दऱ्यांवर रांगा लावतात. दर्शनाने ते इतके समाधान पावतात की घेतलेल्या कष्टाचे त्यांना काहीच वाटत नाही. संपूर्ण चार्ज झालेली आत्मारूपी बॅटरी प्रत्यक्ष सूर्याप्रमाणे तेजोमय बनून लखलखू लागते, रेडिएट होते. जसा सूर्य कोणतीही मागणी न करता उर्जा देत राहतो. किंबहुना तो देण्याची काही मेहनत करत नाही, स्वाभाविकपणे देत राहतो. आपण देत आहोत याचीही त्याला जाणीव नसते, **तद्वत संपूर्ण चार्ज झालेला राजयोगी आत्मा स्वाभाविकपणे विनामेहनत, अजाणतेपणे आत्मिक ऊर्जा देत राहतो. प्रसन्नता, आनंद, मांगल्य, उत्साह, आशा आदी आदी प्रकारची उर्जा त्याच्या संपर्कात येणारा आणि न येणारासुद्धा सहजासहजी प्राप्त करतो. हे आहे योगाचे सामर्थ्य!**

तात्पर्य म्हणजे राजयोग हाच विश्वपरिवर्तन आधार आहे. ■■

मन-एक संग्रहालय

- ब्र.कु. नीता, बोरीवली (प.)

भले बुरे ते घडून गेले,
विसरूनी जाऊ सारे क्षणभर,
जरा विसाऊ या वळणावर,
या वळणावर....

सर्व ब्रह्मावत्सांना संगमयुगावर मिळालेला हा नवीन जन्म, ह्या जन्मामध्ये चांगले-वाईट जे काही आपण आपल्या मनाच्या तिजोरीत बंद करून ठेवले आहे त्याला ईश्वर चरणी स्वाहा करण्याची ही उत्तम वेळ आहे. **ह्या चंचल मनामध्ये जे काही साठवून ठेवले आहे, जो पर्यंत त्या सर्व गोष्टी, प्रसंग आपण Delete (काढून टाकत) करत नाहीत तो पर्यंत शिवबाबाकडून जे रोज मुरलीद्वारे नवीन, निराळे ज्ञान मिळत आहे त्याचा संग्रह होऊ शकत नाही.**

एखाद्या वस्तुसंग्रहालयामध्ये कितीतरी वर्षापूर्वीच्या वस्तू विशेष जमा केल्या जातात. त्यांना बघण्यासाठी मनुष्य खास त्याठिकाणी भेट देतात. **आपल्या ह्या जीवनात आपण जर जुन्या गोष्टींचा, प्रसंगाचा संग्रह करण्याऐवजी त्या प्रसंगातून मिळालेली शिकवण जपून ठेवली तर त्याचा नक्कीच आपल्याला भावी जीवनामध्ये लाभ होऊ शकतो.** पौराणिक काळातील अनेकानेक राजे जे शुरवीर होऊन गेले, त्यांच्या छोट्या-छोट्या वस्तू जसे चमचे, सुरी, बटण... ह्यांना सुद्धा सांभाळून ठेवले जाते. शिवबाबा तर आपल्याला त्याच्याही आधीचा काळ स्मृतीत आणण्यासाठी रोज मुरलीमध्ये सत्ययुगी दुनियेचे वर्णन करत असतात. आपण त्या प्रसंगांना आठवण्याचा प्रयत्न केला किंवा त्या सुखाचा अनुभव करण्याचा ध्यास घेतला तर नक्कीच आपले वर्तमान जीवन सुद्धा सुखी समाधानी बनू शकेल.

मनोवैज्ञानिकाच्या दृष्टीने आपल्या मनामध्ये दिवसभरात ३०,००० किंवा त्याहून ही अधिक विचार येतात. थोडं थांबून जर त्याचे अवलोकन केले की माझे हे मन नक्की कोणत्या गोष्टीचा विचार करण्यामध्ये busy (व्यस्त) आहे तर आढळून येईल की निरर्थक, नकारात्मक, प्रश्नार्थक विचारांच्या गोंधळामध्ये ते फसले आहे कोणत्या मार्गाने जावे, काय करावे ह्यांची गुंतागुंत दिसून येते. मनाची ही ओढाताण, अस्वस्थता जर थांबवायची असेल तर मनाला सद्विचारांनी भरण्याचा पूर्णपणे प्रयत्न करायला हवा. **जसे एखाद्या फुलदाणीसाठी अतिशय सुंदर, रंगीबेरंगी, सुगंधी फुलांची निवड केली जाते तसेच आपण ह्या मनामध्ये सुद्धा सुखद, सुंदर, समाधानी विचारांची निवड केली तर हे मन अतिशय शक्तिशाली झाल्याचे आपल्यास जाणवेल.**

विचारांची शुद्धता आणि स्पष्टता आपल्याला ईश्वराने दाखवलेल्या लक्ष्यापर्यंत पोहचवू शकते. ज्या महान विभूती आपल्या दृष्टीक्षेपात आहेत, त्याच्या विचारसरणीला न्याहाळले तर हे जाणवेल की, ध्येयपूर्तीसाठी त्यांनी जे सिद्धांत किंवा नियम बनवले त्यांच्या आड भले कितीही परिस्थिती, आकर्षण, दुःख आली तरी मनाचा संयम, विवेकशक्तींचा वापर पदोपदी केला गेला. सुखाचा स्वाद घेतला तसेच दुःखाचे सहर्ष स्वागतही केले. मन आणि बुद्धीचा अप्रतिम ताळमेळ असल्यामुळे त्यांनी जीवनाच्या रणभूमीवर विजय प्राप्त केला.

आपल्याकडे शरीराच्या प्रकृतीचे ज्ञान आहे तसेच मनाची अवस्था समजण्याची गरज आहे. जसे आपण कोणता पदार्थ खाल्ल्याने स्वास्थ्य बिघडते हे ध्यानी ठेवतो तसेच कोणत्या विचारांनी माझे मन दुःखी होते ह्याचेही ज्ञान हवे. ज्यांच्याकडे ही समज आहे ते नेहमीच सतर्क राहून आपला आनंद किंवा खुशी जोपासण्याचे अनेकानेक उपाय योजत राहतात. रोज मिळणारे ईश्वरीय ज्ञान आत्म्याच्या कमजोर मनासाठी एक टॉनिकचे काम करते. स्वमानाचा नियमित अभ्यास मनाला लवचिक बनवण्यास मदत करतो.

मनाची सुंदरता जीवनाला सुंदर आणि सुखी बनवते. तसेच मनाची कटुता संबंधांमध्ये आणि व्यवहारामध्ये सुद्धा कटुता आणते. **आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक क्षणाचा आस्वाद घ्यायचा असेल तर मनाच्या गाभाऱ्यात जाऊन थोडा वेळ निवांत बसायला हवे. त्या गाभाऱ्यात शिवबाबांची प्रतिमा न्याहाळत, त्यांच्याशी सुमधुर संवाद साधण्याची सवय स्वतःला लावली तर मनाचे संतुलन कायम राहू शकते. ईश्वराचे सान्निध्य ज्या आत्म्यांना लाभले आहे त्यांच्या भाग्याचे वर्णन ते काय करावे? उच्चकोटीचे ईश्वरीय ज्ञान आपल्याला लाभले आहे. ते सदैव सोबत ठेवून प्रसंगानुरूप त्याचा वापर जर आपण करत राहिलो तर नक्कीच आपले भविष्य उज्ज्वल होईल.** ■■

राजयोगाच्या अभ्यासाने होणारे फायदे

» आत्मारूपी बॅटरी चार्ज होते.
» बुद्धी सुवर्ण पात्राप्रमाणे स्वच्छ बनते.
» बुद्धीत दिव्य गुणांची धारणा सहजच होते.
» खुशी व अतींद्रिय सुखाचा अनुभव होता.
» मन व बुद्धी एकाग्र होते.
» आत्म-अभिमानी स्थिती बनते.
» आत्मा 'रूपवसंत' बनतो.
» राजाईचा तिलक प्राप्त होतो.
» आत्मा 'बेगर टू प्रिन्स' बनतो.
» लक्ष्मी-नारायणाशी विवाह योग्य बनतो.
» भगवान-भगवतीचे सर्वोच्च पद मिळते
» आत्मा सतोप्रधान बनतो.
» ६३ जन्मांचे पापकर्म विनाश होतात.
» विकाररुपी भूत पळून जातात.
» आत्मा मायाजीत बनतो.
» शारीरिक स्वास्थ्य लाभते व आयुष्य वाढते.
» आत्मा 'एवर हेल्दी, वेल्दी, हॅपी' बनतो.
» भविष्यात निरोगी कंचन काया मिळते.
» सर्व कलह-क्लेश समाप्त होतात.
» विषारी काट्यापासून निर्विकारी फूल बनतो.
» विषयसागर पार करून क्षीरसागरात जातो.
» जूने स्वभाव-संस्कार समाप्त होतात.
» कर्मेंद्रियजीत बनतो.
» अंग-अंग शीतल बनतो.
» आपली चलन रॉयल बनते.
» निर्भय, निवैर व निर्बंधन बनतो.
» आत्मा काळावर विजय प्राप्त करतो.
» सेवेत सदा सफलता प्राप्त होते.
» सर्वांविषयी प्रेमभाव उत्पन्न होतो.
» सर्व श्रेष्ठ मनोकामना पूर्ण होतात.
» आत्मा डबल लाईट स्थिती अनुभवतो.
» उपराम बनून उडती कला अनुभवता येते.
» मास्टर सर्वशक्तीवान व निद्राजीत बनतो.
» आत्मा अलर्ट व एक्युरेट बनतो.
» सर्व खजिन्यांनी भरपूर संतुष्टमणी बनतो.
» सदा काळासाठी प्रसन्नता प्राप्त होते.
» आत्मा दुःखहर्ता, सुखकर्ता बनतो.
» आत्मा पद्मापद्म भाग्यशाली बनतो.
» मुक्ती व जीवनमुक्तीचे वरदान प्राप्त होते.
» आत्मा प्रकृतीजीत व विश्वजीत बनतो.
» विश्वात शांती स्थापन होते.
» वृत्ती बेहद कल्याणकारी बनते.
» आत्म्याचा दिव्य गुणांनी शृंगार होतो.
» आत्म्याची 'अंत मती सो गती' श्रेष्ठ होते.

» आत्मा वैजयंती माळेचा मणका बनतो.
» आत्मा पावन बनून उडती कला अनुभवतो.
» आत्म्याला ज्ञान व योगाचे पंख प्राप्त होतात.
» आत्मा अंतर्मुखी बनतो.
» दिलाराम बाबा आपल्या हृदयी निवास करतो.
» एक शिवबाबांशी आत्म्याचे सर्व संबंध जुळतात.
» आत्म्याला परमात्म प्रेमाची अनुभूती होते.
» शिवबाबांपासून करंट व सर्च लाईट मिळतो.
» वायुमंडळ शुद्ध व शक्तिशाली बनते.
» संपूर्ण सृष्टी पवित्र बनते.
» कलियुगाचे सत्ययुगात (स्वर्गात) परिवर्तन होते.
» संगमयुगात आपण दर्शनीय मूर्त बनतो.
» परमात्म प्रेमात लवलीन स्थितीचा अनुभव होतो.

■■

संगमयुगी सद्गुरु पौर्णिमा अत्यानंदे करुया साजरी...

भाग १

ब्र.कु. उज्ज्वलाताई, पुणे

प्रिय बंधुभगिनींनो, आतापर्यंत आपण गुरूप्रेमींनी जनमजन्मांतर अनेक गुरू केले. त्यांच्याविषयी कृतज्ञता व आदर व्यक्त करण्यासाठी दरवर्षी त्यांचे पूजन करून गुरूपोर्णिमा साजरी करीत आलो आहोत. जीवनात अनेक कठीण प्रसंगी गुरूंनी मार्गदर्शन केल्याने त्या कठीण प्रसंगातून आपण सहज पार झालो. तसेच आध्यात्मिक ज्ञान प्राप्तीसाठी गुरूंची आवश्यकता असते. ज्या ग्रंथातील संस्कृत श्लोक संस्कृत वाक्ये व शब्दांचे अर्थ आपल्याला समजत नाहीत अशा वेळी गुरू आपल्याला त्यांचे अर्थ समजावून सांगतात. प्रत्येक गुरूंची विशिष्ट अशी एक जीवनशैली व तत्त्वप्रणाली असते. त्या तत्त्वप्रणालीतूनच त्यांचे तत्त्वज्ञान व स्वतंत्र विचार वारंवार प्रगट होत असतात. आपल्या शिष्यांच्या कल्याणार्थ ते शिष्यांना गुरुमंत्रही देतात जो मंत्र प्रत्येक शिष्याला गुप्त ठेवावा लागतो.

बंधुंनो, जन्मजन्मांतर गुरू केल्यानंतर मनुष्यआत्म्याला कल्पातील अंतिम जन्मात तरी सद्गुरूची प्राप्ती होणे आवश्यक असते. वास्तविक सद्गुरू हा जन्ममृत्युच्या चक्रात येत नसल्याने तसेच तो सदा विदेही असल्याने त्याला ओळखणे सर्वसामान्य मनुष्याच्या दृष्टीने कठीण असते. ह्या सद्गुरुचे निवासस्थानही आकाशतत्वाच्या पार असून त्या निवासस्थानाला 'मुक्तिधाम' असे नाव आहे. असा हा सदा मुक्तिधाम निवासी सद्गुरू आहे तरी कोण? **बंधुंनो, ज्याला परमात्मा, भगवान, ईश्वर, अल्लाह व गॉड म्हटले जाते तोच वास्तविक 'सद्गुरू आहे.' जो पर्यंत अति धर्म ग्लानी समयी सद्गुरू परमात्मा मुक्तिधामाहून अवतरित होत नाही तो पर्यंत साधकाने आपल्या गुरूंचा शिष्य बनून राहण्यात निश्चितच कल्याण आहे. परंतु ज्यावेळी हा सद्गुरू परमात्मा अवतरित होतो त्यावेळी मात्र त्याचा सद्शिष्य बनणे अत्यंत कल्याणकारी असते. सद्गुरू अर्थात आपल्या शिष्यांची सद्गती करणारा व सद्गती अर्थात दुर्गती झालेल्या कलियुगी नर्कातून सत्ययुगी स्वर्गातील सर्वश्रेष्ठ अशा दैवी घराण्यात जन्म प्राप्त करवून देणे होय! सद्गती शिवाय सर्वोत्तम कल्याण कुणाचेही होत नाही.** देहधारी गुरू आपल्या शिष्यांचे एका जन्मासाठी थोडेफार कल्याण करू शकतात परंतु परमात्मा सद्गुरू आपल्या शिष्यांना पूजनीय असे देवत्त्वपद प्रदान करून त्यांचे २५०० वर्षांचा कालखंड असलेल्या सत्ययुग त्रेतायुगात वीस जन्मांचे कल्याण करतो. बंधुंनो, केवळ ह्या एका अंतिम जन्मात पुढील २० जन्मांसाठी आत्म्यात दैवी संस्कार भरण्याची किमया केवळ सद्गुरू परमात्माच करू शकतो. **अत्यल्प काळात मानवमात्राचे सर्वोत्तम कल्याण करणाऱ्या परमात्म्याची गुरुपोर्णिमा नव्हे तर सद्गुरू पोर्णिमा जगातील समस्त धर्मियांनी श्रद्धापूर्वक, एकदिलाने साजरी करावी. जो सद्गुरू पोर्णिमा साजरी करेल, त्याने आपल्या सद्गुरूला यथार्थतः जाणले आहे असे समजावे.**

ज्याप्रमाणे ह्या विश्वाला प्रकाश देणारा भौतिक सूर्य एकच आहे. तद्वतच साऱ्या विश्वाला सद्शक्तींचा ज्ञानप्रकाश देणारा सद्गुरू केवळ ज्ञानसूर्य शिव परमात्मा एकच आहे. त्या सद्गुरूची आपल्या सद्शिष्यांकडून इतकीच अपेक्षा आहे की, त्याने दिलेले ज्ञान जीवनात धारण करून मानवी जीवन हिरेतुल्य बनवावे. जीवन हिरेतुल्य होण्यासाठी सद्गुरू आपल्या शिष्यांना ज्ञानमुरलीच्याद्वारे प्रतिदिन भिन्नभिन्न

वरदान तर देतोच त्याशिवाय अनेक स्वमानांचा अभ्यासही करवून घेतो. स्वमानामुळे आदि स्मृति जागृत होवून शिष्यांच्या मनात नारायणी नशा निर्माण होतो. हा पुरूषार्थ करीत असतानाच शिष्यांना समाजातील अन्य मनुष्यांची आत्मिक सेवा कशी करावी हे देखील शिकवितो. ह्या सेवेत मुख्य सेवा आहे, सद्गुरूचा सत्य परिचय देवून त्याच्या अवतरणाचा संदेश देणे. असा महान व कल्याणकारी संदेश देणे ह्यापेक्षा अधिक पुण्यकर्म ते कोणते असावे?

गुरू कधीही आपल्या शिष्यांना आदि अनादि स्मृति देवू शकत नाही. परमात्मा मात्र ही महान स्मृती देवून पुजारीपणाचे संस्कार नष्ट करून भविष्यात पूज्यपद प्राप्त करवून देतो. परंतु गुरू तर शिष्यांना सदाकाळ पुजारी बनवितो. सद्गतीचा हा देखील एक अर्थ आहे की, पुजाऱ्यापासून पूज्यपद प्राप्त करवून देणे. गुरू आणि सद्गुरू मधील महान अंतर हेच की, गुरू जन्म मृत्यूच्या, स्मृती-विस्मृतिच्या व सतो, रजो, तमो ह्या तीन आत्मिक स्थितींच्या चक्रात तर बद्ध आहेच ह्याशिवाय त्याचा जन्म होताच तो दैहिक धर्मात व दैहिक संबंधात बद्ध होतो. फलस्वरूप त्याच्या कार्याला मर्यादा येते. परंतु परमात्मा कोणत्याच चक्रात, कोणत्याच दैहिक धर्मात व कोणत्याच दैहिक संबंधात बद्ध होत नसल्याने त्याचे कार्य अमर्याद असते. एखादा गुरू फार तर ५० वर्षे आपल्या शिष्यांना ज्ञान देवू शकतो. सद्गुरू मात्र १०० वर्षेच काय परंतु महाविनाशापर्यंत आपल्या शिष्यांना ज्ञान देवू शकतो. त्यासाठी त्याला ब्रह्माच्या शरीराशिवाय अन्य शरीराचा आधार घ्यावा लागतो. गुरुंच्या मृत्युपश्चात त्यांच्या शिष्यांना हमखास दुःख होते. परंतु अमरनाथ परमात्मा अमर असल्यामुळे तो आपल्या शिष्यांची साथ कधीच सोडत नाही. तो आत्मज्ञान देताना हेच सांगतो की, 'जसा मी परमात्मा अमर आहे तसे तुम्ही माझे संतान आत्मेही अमरच आहात म्हणून तर माझे विशेष नाम अमरनाथ आहे' आत्मा व परमात्म्याच्या अमरत्वाविषयी ह्या विद्यालयाचे एक गीत मनुष्याला अमरत्त्वाची जाणीव करून देते त्या गीताचे बोल आहेत 'साथी अमर मैं भी अमर, कितना सरल अपना सफर .... कैसे कहूँ बाबा मेरे....' परमात्मा सद्गुरूची ही अमरत्वाची पालना अविस्मरणीय आहे. आपल्या शिष्यांची सद्गती होण्यासाठी **तो मनुष्यसृष्टीचा अनादि नियम समजावून सांगतो की, कामक्रोधादि विकारांच्या अधीन होवून कर्म केल्यास मनुष्य आत्म्याची दुर्गती होवून तो पापात्मा बनतो. त्यासाठी अत्यंत प्रेमाने तो हेच सांगतो की, 'मीठे बच्चे, गृहस्थ व्यवहारमें रहते हुए कमलपुष्पसमान पवित्र रहो, यह कामविकार आदि, मध्य और अंतमें दुःख देनेवाले है।'** भगवत् गीतेतही ह्या विकारावर कडक टीका असल्यामुळे कोणताही गुरू आपल्या गृहस्थी शिष्यांच्या समोर त्याविषयीचे स्पष्ट निरूपण करण्याचे टाळतो. सद्गुरू परमात्मा मात्र आपल्या शिष्यांची जन्मजन्मांतराची विकर्मे भस्म होण्यासाठी राजयोगही शिकवितो. ही विकर्मे भस्म झाली की, ह्याच राजयोगामुळे आत्म्यात पुण्यसंचय जमा होवून तो सोळा कला संपन्न पुण्यात्मा सत्ययुगात देवात्मा बनून, आपले दैवी प्रारब्ध उपभोगतो. हे समस्त मनुष्यआत्म्यांनो, ह्याच भारतात अल्पावधीत निर्माण होणाऱ्या सत्ययुगी स्वर्गात प्रवेश करण्याची विधी धैर्यतापूर्वक समजावून घ्यावी. ही मनुष्यसृष्टी अर्धाकल्प स्वर्ग असते तर अर्ध्या कल्पानंतर ती नर्क बनते.

बंधुंनो, ज्याप्रमाणे लौकिक पिता आपल्या मुलाच्या कल्याणार्थ त्याचा हात धरून त्याला शाळेत सोडतो. तद्वतच ह्या पुरुषोत्तम संगमयुगावर केवळ त्या परमपित्याचा श्रीमतरूपी हात धरावा. हा हात तुम्ही धराल तर परमपिता तुम्हाला सत्ययुगी स्वर्गात आदि मध्येच जन्म प्राप्त करवून देईल. तुमचा आदिमध्ये जन्म झाला की, २५०० वर्षे (दोन युगे) तुम्हाला अपार असे स्वर्गीय सुख प्राप्त होईल. लवकरच ह्या भारतात निर्माण होणाऱ्या सत्ययुगी स्वर्गात जन्म घ्यावयाचा अथवा कल्प-अल्प नर्कवासीच बनावयाचे ह्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय ह्या संगमयुगावर आपणा सर्वांना घ्यावयाचा आहे. हा समय आहे सद्गुरुद्वारा सद्गती करवून घेण्याचा अर्थात स्वर्गीय राज्यभाग्य प्राप्त करण्याचा जे राज्यभाग्य कोणताही गुरू ना स्वतःसाठी ना आपल्या शिष्यांसाठी प्राप्त करू शकतो.

कल्याणकारी पुरुषोत्तम संगमयुगाला जो साधक यथार्थतः जाणतो तो श्वासोच्छ्वास सद्गुरू परमात्म्याच्या स्मृतीत राहतो व काही कालावधीतच त्याच्याशी साकार मिलनही साध्य करतो. अशा साधकाला परमात्मा अतींद्रिय सुखाच्या सर्वोच्च शिखरावर विराजमान करून संपूर्ण पावन बनवितो.

क्रमशः

भाग १२

ईश्वरीय सेवेच्या साधनांमधील परिवर्तनाचा इतिहास

- ब्र.कु. रमेश शाह, गावदेवी (मुंबई)

परिवर्तन या सृष्टीचा नियम आहे. एका लेखकाने लिहिले आहे की, नदी शाश्वत आहे. परंतु तिच्या आतील पाणी सतत परिवर्तनशील आहे. इंग्रजीत म्हटले जाते- Staticness is death and dynamism is life. शरीरात जोपर्यंत आत्मा आहे तोपर्यंत जीवन आहे. आत्म्याने शरीर सोडल्यानंतर शरीर अचेतन होते, त्यालाच मृत्यू म्हटले जाते.

परमप्रिय अव्यक्त बापदादांनी म्हटले आहे की, विज्ञानाचे सारे शोध आपल्यासाठीच आहेत. विज्ञानसुद्धा सत्याच्या शोधात आहे आणि सदैव परिवर्तनशील आहे. विज्ञानाच्या क्षेत्रातील या परिवर्तनाच्या बाबतीत मी कधी कधी विचार करतो की, विसाव्या शतकात किती नव्या-नव्या वस्तूंचा शोध लागला. जेव्हा प्रकृती आणि मनुष्यात्मा दोन्हीही तमोप्रधान आहेत. याच्या तुलनेत सत्ययुग-त्रेतायुगातील विज्ञान किती समृद्ध असेल जे काळाच्या गर्भात सामावलेले आहे.

या लेखात मी त्या सर्व गोष्टींचे वर्णन करीन ज्या आपल्यासमोर आल्या आणि प्रायःलोप झाल्या. उदाहरणार्थ सन १९१० मध्ये अमेरिकेतील फोर्ड कंपनीची मोटर आली. तिच्या तुलनेत २०१० मध्ये म्हणजे मागील १०० वर्षांमध्ये किती परिवर्तन झाले आहे. आजकालच्या मोटारींचा फोटो आता दाखविण्याची आवश्यकता नाही. अशाप्रकारे आपल्या ईश्वरीय सेवेत आणि लौकिक दुनियेत उपयोगात येणाऱ्या अनेक गोष्टींमध्ये परिवर्तन झाले आहे.

१५ जुलै २०१३ मध्ये भारत सरकारने Telegram ची सेवा-बंद करून टाकली. सन १९८४ मध्ये जेव्हा मी जर्मनीत गेलो तेव्हा तेथे प्रत्येक ४-५ मैल अंतरावर एक मिनार बांधले होते. आम्हाला सांगितले की, पहिल्या जमान्यात प्रत्येक मिनारमध्ये संदेशवाहक राहत असत. ते संदेश घेऊन घोड्यावर स्वार होऊन पुढील मिनारापर्यंत जात असत. याप्रकारे साधारण ३६ तासांमध्ये जर्मनीहून रोमपर्यंत संदेश पोहचविला जाई. ईश्वरीय सेवेतही तार फार महत्त्वपूर्ण राहिली.

एक काळ होता जेव्हा मधुबनमध्ये एकच टेलिफोन होता. त्याचा नंबर होता. २३ आणि त्यावेळेस थेट डायलिंग सिस्टीम नव्हती. म्हणून आम्हाला टेलिफोन बुक करावा लागे. आज तर सर्वच भाऊबहिणींच्या हाती मोबाईल आहे.

एक काळ होता जेव्हा मधुबनमध्ये बसस्टॅण्डवरून पांडव भवनपर्यंत सामानाची ने-आण करण्यासाठी बैलगाडी होती. त्यावेळी आम्ही मधुबनला जात होतो, तेव्हा बसस्टॅण्डला उतरत असू. पांडव भवनहून बैलगाडी येत असे, त्यामध्ये आमचे सामान चढवीत असू. मागच्या रस्त्याने पांडव भवनात पोहचत असू. बैलगाडी नंतर मधुबनमध्ये पहिले वाहन म्हणजे एक व्हॅन खरेदी केली गेली. तिला दादा आनंद किशोर चालवित असत. तसे तर कराचीमध्ये बाबांकडे वाहने होती. त्यावेळी बृजेंद्रा दादी बस चालवित असत. एकदा बसला अपघात झाला. त्यात राधाबहेनजीचा हात कापावा लागला. त्यावेळेस त्या अपघाताची बातमी वृत्तपत्रात आली होती की, भारतात एक महिला बस चालवित आहे. आज तर भगिनी विमान, रॉकेट इत्यादीचे संचालन करीत आहे.

यज्ञामध्ये सुरुवातीच्या काळात ब्रह्माबाबा कवि रूपामध्ये, येणाऱ्या नवविश्वाच्या अनुभवाचे गीत लिहित असत आणि मातेश्वरीजी ती गीते लयबद्ध करून गात असत. त्यात दोन गीतं प्रसिद्ध आहेत. 'ओम मंडलीमें जाकर हमने क्या देखा' आणि

एक काळ होता जेव्हा मधुबनमध्ये एकच टेलिफोन होता. त्याचा नंबर होता. २३ आणि त्यावेळेस थेट डायलिंग सिस्टीम नव्हती. म्हणून आम्हाला टेलिफोन बुक करावा लागे. आज तर सर्वच भाऊबहिणींच्या हाती मोबाईल आहे.

'पाना था सो पा लिया...' इ.इ. 'चढो रे मोहे आज अलौकिक रंग...' हे महात्मा गांधीजींच्या आश्रमातील गीत मातेश्वरीजी फार आवडीने गात असत.'

यज्ञात त्यावेळी एक रेकॉर्डिंग मशीनसुद्धा होती. त्यात आनंदीबहेन इत्यादींचे प्रवचन रेकॉर्ड केले होते. ती रेकॉर्ड आबूमध्येही आली होती. मी ती मुंबईला घेऊन गेलो आणि रेडिओग्रामवर वाजवित असे. मातेश्वरीजी जेव्हा आठ महिने आमच्या घरी वास्तव्यास होत्या तेव्हा त्यांनी ती जुनी रेकॉर्ड नष्ट करायला सांगितली. नंतर यज्ञात रेडिओग्राम आला ज्यावर जुन्या हिंदी सिनेमाची गीते वाजविली जात असत. जी आता साकार मुरलीमध्ये येतात. मुरली सुरू करण्यापूर्वी बाबा चंद्रहास दादांना सांगत असत की, आज हे गीत वाजव. त्यानंतर बाबांची मुरली सुरू होत असे. त्या काळात मुरलीसुद्धा हाताने लिहिली जात होती हिंदी आणि सिंधी भाषेमध्ये. एक लिथो मशिन होते; त्यावर मग अनेक मुरलीच्या प्रति छापून येत आणि मग त्या सर्व ठिकाणी पाठविल्या जात. मुरली हस्तलिखित असल्याने अनेकवेळा अक्षर वाचता येत नसे.

विदेशात जेव्हा सेवा सुरू झाली तेव्हा येथून तिकडे मुरली लंडनला जाई; तेथे तिचा इंग्रजीत अनुवाद झाल्यावर मग ती सगळीकडे पाठविली जात असे. त्यामुळे फार उशिरा मुरली मिळत असे. भारतात छपाई झाल्यावर पोस्ट करण्यास ४-५ दिवस जात. अशाप्रकारे १०-१२ दिवसांनी मुरली मिळत असे. आज तर अव्यक्त बापदादांची मुरली आय.टी. साधनांद्वारे त्याचवेळी आपण देश-विदेशात ऐकत असतो.

त्या काळात टेपरेकॉर्डरही नसल्यामुळे मुरली टेप होत नव्हत्या. एकदा मुंबई वॉटर्लु मेंशन सेंटरवर येणारे काही भाऊ जहाजाने लंडनला जाणार होते. तेव्हा त्यांना मी काही डॉलर दिले आणि म्हटले की, तुम्ही लंडनला गेल्यावर मुरलीदादाची आई सत्यभामा माता आणि जयंतिबहेनची मातोश्री रजनी बहेन यांना भेटा आणि तिकडून एखादी संस्मरणीय वस्तू घेऊन या. रजनी बहेनने त्यांच्याबरोबर स्पुल असणारा छोटा टेपरेकॉर्डर दिला. ज्यावर दोन्ही बाजुंनी १०-१० मिनिटांची रेकॉर्डिंग होत असे. ब्रह्माबाबा जेव्हा वॉटर्लु मेंशन सेंटरवर येत असत तेव्हा आम्ही टेपरेकॉर्डमध्ये २० मिनिटांची मुरली रेकॉर्ड करीत असू आणि सायंकाळी सेंटरवर येणाऱ्या भाऊबहिणींना ऐकवित असू. ब्रह्माबाबांना आम्ही टेप केलेली मुरली ऐकविली. तेव्हा ते म्हणाले की, हा तर माझा आवाज आहे! त्यावर मी म्हणालो की, बाबा मी रोज सकाळी आपली मुरली रेकॉर्ड करतो आणि सायंकाळी पुन्हा ती ऐकविली जाते. मग बाबाने पुष्पशांता दादींना सांगितले की, असा मोठा टेपरेकॉर्डर बँगलोरच्या टीकन दादीकडे आहे, जो त्यांना नातेवाईकांकडून भेट मिळाला आहे. त्याला मागावून घे. नंतर त्यात मुरली रेकॉर्ड होऊ लागली. जेव्हा ब्रह्माबाबा आबूला गेले तेव्हा तो टेपरेकॉर्डर बरोबर घेऊन गेले. आबूला तिकडे मुरली रेकॉर्ड करून मग ती मुंबईत ऐकविली जाई.

अशा प्रकारे टेपरेकॉर्डरद्वारे ईश्वरीय सेवा सुरू झाली. **ब्रह्माबाबांनीही म्हटले की, सर्वात श्रेष्ठ आहे मुरली. डायरेक्ट ऐकणे, दुसऱ्या नंबराने आहे टेपरेकॉर्डर वर ऐकणे, तिसऱ्या नंबराने आहे टिचरद्वारा ऐकणे आणि चौथ्या नंबरावर आहे घरी बसून मुरली वाचणे.** काही काळानंतर स्पुलवाला टेपरेकॉर्डर तर प्रायःलोपच झाला. आणि फ्लॉपी डिस्कचा जमाना आला. मोठ्या फ्लॉपी डिस्कमध्ये जी पुठ्ठ्यांची असे, ती वाकडी तिकडी झाल्यास निरुपयोगी होई. छोटी फ्लॉपी मजबूत असे आणि पोस्टाद्वारे पाठवायला बरी पडे. नंतर कॅसेट रेकॉर्डरवरून विडीओ कॅसेट रेकॉर्डर (विसीआर)ची सुरुवात १९७१ मध्ये झाली.

त्या जमान्यात कॉम्प्युटर (संगणक) नव्हते आणि त्यामुळे कार्यव्यवहारात अनेक प्रकरच्या समस्या येत होत्या. मी जेव्हा सी.ए. पास केले तेव्हा रशियन कॉम्प्युटर शिकविले गेले. त्यात रेकॉर्ड करण्यासाठी २

मातेश्वरीजी जेव्हा आठ महिने आमच्या घरी वास्तव्यास होत्या तेव्हा त्यांनी ती जुनी रेकॉर्ड नष्ट करायला सांगितली. नंतर यज्ञात रेडिओग्राम आला ज्यावर जुन्या हिंदी सिनेमाची गीते वाजविली जात असत. जी आता साकार मुरलीमध्ये येतात. मुरली सुरू करण्यापूर्वी बाबा चंद्रहास दादांना सांगत असत की, आज हे गीत वाजव.

इंचाची फिल्म असे. कॉम्प्युटर अगदी कपाटा एवढा मोठा असे, नंतर बाजारात कॉम्प्युटर मिळायला सुरुवात झाली. जेव्हा यज्ञामध्ये कॉम्प्युटरची आवश्यकता निर्माण झाली तेव्हा मी दादी प्रकाशमणीजींना कॉम्प्युटर घेण्याबाबत विचारले. त्यावर दादी म्हणाल्या की यज्ञात इतक्या महाग वस्तूचे काय करणार? तेव्हा मी दादींना म्हटले की, मला आमच्या ऑफिससाठी खरेदी करायचा आहे. तेव्हा दादीजीने त्यासाठी संमती दिली. वर्तमान ऑडीटर असलेले भ्राता आनंदजीने कॉम्प्युटरमध्ये हिशेब लिहायला शिकून घेतले होते. त्यानंतर कॉम्प्युटरमध्ये किती लवकर काम होते ते दादीजींना दाखविल्यानंतर त्यांनी खरेदी करण्यासाठी परवानगी दिली. अशाप्रकारे कॉम्प्युटरसुद्धा ईश्वरी सेवेमध्ये कामी आले. आणि आज तर कॉम्प्युटर, लॅपटॉप इ. असणे ही सामान्य बाब झाली आहे.

शिवबाबांचे महावाक्य आहे की सायन्सची साधने ईश्वरीय सेवेसाठीच बनले आहेत. त्या काळात फॅक्स मशिनसुद्धा नव्हते. नंतर चीनमधून त्याची सुरुवात झाली. मुंबईत चीनमधून ३ फॅक्स मशिन्स मागविली गेली. त्यातील एक मशिन आबू, दुसरे अहमदाबाद व तिसरी मुंबईत ठेवली गेली. आता तर फॅक्स मशिनसुद्धा अप्रचलित झाली आणि ई-मेलद्वाराच सर्व काम होऊ लागले आहे.

त्या काळात रेडिओ होते. ब्रह्मा बाबांच्या खोलीत आम्ही त्यांच्याबरोबर अनेकवेळा रेडिओवर बातम्या ऐकल्या. आज तर रेडिओचा जमानाही निघून गेला आहे आणि टीव्ही न्यूज चॅनेल्सवर २४ तास बातम्या येत असतात. एकेकाळी इंग्लंडमध्ये खूप मोठे ग्रंथ छापले जात; ज्याला Encyclopedia म्हटले जाते. कसलीही माहिती हवी असल्यास, त्यातून प्राप्त होत असे. सन १९५० साली Encyclopedia चे ३२ ग्रंथ छापले गेले. त्यांचे वजन ५८ किलो होते आणि ते ग्रंथ फार मुल्यवान समजले जात. विश्वातील मोठमोठ्या लायब्ररींमधून ते ठेवले जात. आता तर इंटरनेट ब्राऊजर्ससारखे गूगल इ.च्या माध्यमातून जी माहिती हवी ती मिळवू शकतो.

अशाच प्रकारे कॅमेरामध्ये फिल्म असत. फिल्मद्वारेच फोटो काढले जात. प्रथम त्याचे निगेटीव बनवून, ती धुतल्यानंतर पॉजिटीव्ह बनविली जाई. व त्यानंतर प्रिंट्स काढल्या जात. त्या काळात कोडॅक, फ्युजी इ. कंपनींद्वारा बनलेल्या फिल्मस् फार प्रसिद्ध होत्या. परंतु नंतर डिजीटल कॅमेरे आले. फ्युजी कंपनीने तर डिजीटल टेक्नोलॉजी अवलंबिली परंतु कोडॅक कंपनीने डिजीटलबरोबर फिल्म बनविण्याचा उद्योगदेखील सुरू ठेवला. कारण त्यांच्या कर्मचाऱ्यांनी म्हटले की, तुम्ही हे बंद केले तर आम्ही उपाशी मरू. त्यांनी नवीन तंत्रज्ञान लगेच न अवलंबल्यामुळे कंपनी तोट्यात गेली. जेव्हा फ्युजी कंपनीच्या मालकाने त्वरीत नवीन तंत्रज्ञान उचलले ज्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती खुप उंचावली गेली. यावरुन सिद्ध होते की, काळाबरोबर जे परिवर्तन येते, त्यानुसार त्याचा स्वीकार केला गेला पाहिजे. त्या जमान्यात टाईपरायटर खूप उपयोगात येत असे, त्याचे कोर्से सही बनले होते. नंतर मग सायमेन स्टाइल मशिनद्वारा प्रिंट्स निघत असत. यातून दुनियेत दोन प्रकारचे वर्ग उदयास आले. १.टायपिस्ट व २. स्टेनोग्राफर ज्यांच्यामार्फत त्वरीत लेखन व टायपिंगचे काम होत असे. आज टाईपरायटर व सायक्लोस्टाईल मशिन कालबाह्य झाल्या. आज तर कॉम्प्युटर व प्रिंटर आले. आपल्या विश्व विद्यालयातसुद्धा अव्यक्त बापदादा वेळोवेळी ईश्वरीय सेवेत नवनवीन साधनांद्वारे सेवा करण्याची प्रेरणा देतात. जे नवीन सेवा करण्यासाठी अनुभवी बनतात, तेच पुढे जातात, त्यांचाच लौकिक वाढत जातो.

या लेखनामागे आशय असा आहे की, समयानुसार ताळमेळ साधून ईश्वरीय सेवेत नवीन वस्तूंचा शोध घेऊन, सेवेमध्ये वृद्धी करावी कारण समय आणि साधन यांचे मुल्य आपणच जाणतो. समय अतिशय कमी आहे आणि कमी काळातच आपल्याला बाबांचा संदेश सर्वांपर्यंत पोहचवायचा आहे.

(भावानुवाद. बी.के. जयश्री, विक्रोळी मुंबई)

■■

शिवबाबांचे महावाक्य आहे की सायन्सची साधने ईश्वरीय सेवेसाठीच बनले आहेत. त्या काळात फॅक्स मशिनसुद्धा नव्हते. नंतर चीनमधून त्याची सुरुवात झाली. मुंबईत चीनमधून ३ फॅक्स मशिन्स मागविली गेली. त्यातील एक मशिन आबू, दुसरे अहमदाबाद व तिसरी मुंबईत ठेवली गेली.

भाग २

असत्य नरनारीपासून सत्य श्री लक्ष्मी नारायण बनण्याची सत्यकथा

- ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे

पिताश्रींनी नरापासून श्री नारायण बनण्याचा पुरुषार्थ केला त्याप्रमाणे मातेश्वरींनीही नारीपासून श्री लक्ष्मी बनण्याचा पुरुषार्थ केला. त्यांचा हा पुरुषार्थ समस्त नरनारींसाठी एक महान आदर्श होता म्हणून स्वतः शिवबाबांनी यज्ञातील समस्त माता भगिनींसाठी 'फॉलो मदर' हे शब्द वापरून केवळ त्यांचेच अनुकरण करण्याची आज्ञा केली.

परमात्मा जरी ज्ञान अर्जन करणाऱ्या अर्जुनाला अर्थात आत्म्याला सर्वश्रेष्ठ मार्गदर्शन करीत असला तरी सर्वश्रेष्ठ लक्ष्य साध्य करण्यासाठी पुरुषार्थ तर आत्म्यालाच करावा लागतो. तो पुरुषार्थ यथार्थतः व्हावा व श्रेष्ठ लक्ष्याची कधीही विस्मृती होऊ नये. म्हणून परमात्मा ब्रह्माला 'अहम् चतुर्भुज विष्णु ततत्वम्चा दिव्य साक्षात्कार करवितो' ह्या अद्वितीय साक्षात्कारामुळे आत्मिक पतनाला फार मोठा प्रतिबंध निर्माण होवून आत्मा उद्धाराच्या दिशेकडे झुकू लागतो. उद्धाराचे लक्ष्य प्राप्त करण्यासाठी पुरुषार्थ कोणता करावयाचा हे परमात्मा स्पष्ट करतो. **प्रत्येक आत्म्यासाठी पुरुषार्थ हाच आहे की, आत्म्याला पतित बनविणाऱ्या देहाभिमानाचा, पाच विकारांचा, विकारी, व्यर्थ संकल्पांचा व त्याचबरोबर विकारी कर्मांचा त्याग करून आत्माभिमानी स्थितीद्वारे संपूर्ण पावन, निर्बंधन व जीवनमुक्त स्थिती प्राप्त करून भविष्यात तो आपले देवत्त्वपद प्राप्त करू शकतो.** ह्या व्यवहारी व तमोप्रधान जगात आत्म्याची स्थिती शक्तिशाली रहावी म्हणून परमात्मा अष्टशक्तींचे ज्ञान प्रदान करतो. ह्या शक्तिंबरोबर दैवी गुणही धारण करावयाचे आहेत. ज्ञान, योग, धारणा व सेवा ह्या चारही विषयात उत्तम मार्क्स प्राप्त केल्यास साधक राजयोगाच्या लिफ्टद्वारे नं १ पायरीवर निश्चित व निश्चिंतपणे पोहोचेल. सर्व सेवामध्ये मनसा सेवा अधिक महत्त्वपूर्ण असल्याने विश्वातील सर्व आत्म्यांना त्याचबरोबर पाच तत्त्वांनाही योगदान करणे आवश्यक आहे. शिव भगवान उवाच-''**ही पाच तत्त्वे सत्ययुगात सत्तोप्रधान होवून तुम्हा देवात्म्यांचे सेवक बनतील. ह्याच सत्तोप्रधान तत्त्वांपासून सत्ययुगात तुम्हाला दैवी कांचनकायाचे सत्तोप्रधान शरीर प्राप्त होईल. स्वकल्याण व विश्वकल्याणार्थ हा ईश्वरीय संदेश सर्वांना देवून, वारसदार गुणवत्तेच्या आत्म्यांना तुम्हाला शोधून काढावयाचे आहे. सेवेशिवाय राजयोग्याचे जीवन व्यर्थ आहे.**''

ज्ञानयज्ञातील आरंभीच्या काळात योगी बना, ज्ञानी बना व पवित्र बना ही परमात्म्याची आज्ञा पिताश्रींनी (ब्रह्माबाबांनी) सर्व ब्रह्मावत्सांना सांगितली. पवित्रतेच्या ह्या पालनेमुळेच आत्म्याचा उद्धार होवून, त्याचे जन्मजन्मांतराचे कल्याण केवळ ईश्वरीय ज्ञानातच आहे. ह्याची मनोमन खात्री पटल्यामुळे प्रवृत्तितील ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारी ह्या आज्ञेचे पालन स्वेच्छेने करू लागले. **त्यांच्यासाठी परमात्म्याचे महावाक्य होते व नव्याने येणाऱ्या प्रवृत्तीतील युगलांसाठी ते आजही आहे 'बच्चे गृहस्थ व्यवहारमें रहते हुए भी कमल समान पवित्र और न्यारे रहो।'** पवित्रतेच्या ह्या असाधारण धारणेमुळे पिताश्रींना अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागले. कोणत्याही व कितीही समस्या निर्माण झाल्या परंतु त्यांनी स्वपुरुषार्थ व ब्रह्मावत्सांच्या पालनेत कधी खंड पडू दिला नाही. पिताश्रींची

विशेष पालना होती, ब्रह्मावत्सांचा देहाभिमान नष्ट करून त्यांना संपूर्ण निर्विकारी बनविणे, ही पालना करीत असतानाच पिताश्रींनी संपूर्ण आत्माभिमानी व निर्विकारी स्थितीद्वारे मायेवर विजय प्राप्त केला. त्यांनी आपल्या दृष्टीद्वारेही ब्रह्मावत्सांची पालना केली ते ज्या ब्रह्मावत्साला दृष्टी देत तो ब्रह्मवत्स काही क्षणात अशरीरी होण्याचा अनुभव करीत असे. ब्रह्मावत्सांच्याकडून पुरुषार्थ करवून घेण्याचे पिताश्रींचे कौशल्य अद्वितीय होते. ह्याच कौशल्याद्वारे त्यांनी अष्टरत्नांना आपसमान बनविले. पिताश्रींनी दिलेली पालना अविस्मरणीय होती. ज्यांनी त्यांची साकार पालना घेतली ते ब्रह्मावत्स धन्य होत! त्यांची पालना मातृवत असल्याने त्यांना 'ब्रह्मा माँ' म्हणूनही संबोधिले जाते.

ज्या ब्रह्मावत्सांनी पिताश्रींची विशेष पालना घेतली त्यामध्ये विशेष पुरुषार्थ करणाऱ्या होत्या '**मातेश्वरी जगदंबा सरस्वती**'. ह्या ज्ञानयज्ञात सर्व ब्रह्मावत्स त्यांना आदराने 'मम्मा' म्हणत होते. त्यांची लौकिक माताही त्यांना 'मम्मा' अशीच हाक मारीत असे. बाबांनी मम्मांना ईश्वरीय ज्ञान समजावून सांगितल्यानंतर त्यांनी ह्या कार्यासाठीच आपले जीवन समर्पण करण्याचा दृढ निश्चय केला. ज्याप्रमाणे पिताश्रींनी नरापासून श्री नारायण बनण्याचा पुरुषार्थ केला त्याप्रमाणे मातेश्वरींनीही नारीपासून श्री लक्ष्मी बनण्याचा पुरुषार्थ केला. त्यांचा हा पुरुषार्थ समस्त नरनारींसाठी एक महान आदर्श होता म्हणून स्वतः शिवबाबांनी यज्ञातील समस्त माता भगिनींसाठी 'फॉलो मदर' हे शब्द वापरून केवळ त्यांचेच अनुकरण करण्याची आज्ञा केली. बंधुनो, आज भक्त ज्या जगदंबेचे गायन पूजन करतात तीच ही जगदंबा होय! सत्ययुगातील श्री लक्ष्मीच्या आत्म्याला पुरुषोत्तम संगमयुगावर जगत अंबा बनण्याचा पुरुषार्थ करणे आवश्यक असते. कारण ह्या युगावर जी जगत्अंबा बनते तीच सत्ययुगात जगताची महाराणी बनते. श्री नारायण बनण्यासाठी जी ८४ जन्मांची कथा ब्रह्माबाबांची होती तशीच काहीशी कथा मातेश्वरींची होती. जो पुरुषार्थ पिताश्रींनी केला. तसाच पुरुषार्थ मातेश्वरींनीही केला. श्री लक्ष्मीचे श्रेष्ठ लक्ष्य प्राप्त करण्यासाठी दैवी गुण व अष्ट शक्तिची धारणा करणे. निरंतर योग साधना करणे, मनसा सेवा, वाचा सेवा इत्यादी सर्वसाधारण पुरुषार्थ तर त्यांनी केलाच परंतु त्यांच्याजवळ अनेक कलागुण होते. त्या केवळ उत्तम व्यवस्थापकच नव्हत्या तर त्यांचेजवळ अन्य आत्म्यांच्यावर शासन करण्याची कला होती. आपल्या अलौकिक पालनेने त्यांनी सर्वांचीच मने जिंकली होती. त्यांचे कलागुण पाहून ब्रह्माबाबांनी त्यांची यज्ञमाता व मुख्य प्रशासिका म्हणून नेमणूक केली. अर्थात त्या ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या प्रथम प्रशासिका होत्या. त्यांचा पुरुषार्थाचा तीव्र गतीचा होता. शिवबाबांनी ज्ञानमुरलीत व पिताश्रींनी सांगितलेल्या भिन्नभिन्न धारणा त्या त्वरीत अमलात आणीत असत. **तीव्र पुरुषार्थाविषयी त्यांचे महावाक्य होते की, 'एकदा केलेली चूक पुन्हा कधीच होवू न देणे म्हणजे तीव्र पुरुषार्थ होय!' मम्मा सर्व दैवी गुणांच्या साक्षात चैतन्य मूर्ती होत्या.** त्यांच्या आत्म्यात अंतर्मुखता, गंभीरता, धैर्यता, मधुरता, हर्षितमुखता, गुणग्राहकता, प्रसन्नता, पवित्रता, नम्रता शालीनता इत्यादी गुण विद्यमान होते. मातेश्वरींचे जीवन भिन्नभिन्न विशेषता असणाऱ्या देवींच्याप्रमाणे होते. सरस्वतीच्या रूपात विद्यादेवी, लक्ष्मीच्या रूपात ज्ञानधन देणारी, दुर्गेच्या रूपात आसुरी वृत्तिचा संहार करणारी, शिवस्मृतित सदा रममाण असणारी पार्वती, अन्नपूर्णेच्या रूपात ब्रह्मावत्सांची पालना करणारी संतोषी, शीतला देवीच्या रूपात सर्वांना शीतलता प्रदान करणारी तसेच ज्ञानी व अज्ञानी आत्म्यांच्या अलौकिक मनोकामना पूर्ण करणारी कामधेनू अर्थात जगतअंबा होती. मम्मांनी आपल्या २९ वर्षांच्या अलौकिक जीवनात जो महान पुरुषार्थ केला त्या आधारे त्यांना नं १ श्री लक्ष्मीचे पद प्राप्त होणारच आहे कारण ५००० वर्षांपूर्वी त्या श्री लक्ष्मीच्या रूपात त्याच पदावर विराजमान होत्या. मम्मांची वाणी शक्तिशाली असली तरी त्यात एक प्रकारचा गोडवा होता. त्यांची योगसाधना अद्वितीय होती. त्या प्रतिदिनी पहाटे २ वाजता उठून राजयोगाचा अभ्यास करीत होत्या. सर्वांना सन्मान देण्याची त्यांची

वृत्ती त्यांच्या मधुर वाणीतून स्पष्ट होत असे. मम्मांच्या अंतिम समयी व्याधीने जरी त्यांच्या शरीराचा ताबा घेतला असला तरी त्यांच्या मनाचा ताबा व्याधी घेवू शकली नाही. हाच त्यांचा प्रकृतिजीत बनण्याचा अंतिम पुरुषार्थ होता. बंधुंनो, अशाप्रकारे श्री लक्ष्मीचा आत्मा कलियुगाच्या अंतिम चरणापर्यंत आत्मिक पतनाच्या जितक्या पायऱ्या उतरला तितक्याच पायऱ्या त्याने केवळ २९ वर्षांच्या कालमर्यादेत पादाक्रांत केल्या. विश्वमहाराणी श्री लक्ष्मी हे पद कसे प्राप्त करावे ह्याचा आदर्श ह्या जगतमातेने आपल्या अलौकिक पुत्रांच्या पुढे ठेवला आहे म्हणून सर्व नरनारींनी विशेषतः सर्व नारींनी मातेश्वरींच्या ह्या पुरुषार्थापासून प्रेरणा अवश्य घ्यावी. त्यातच समस्त नारींचे कल्याण व आत्मोद्धार होणार आहे.

मम्मांना फॉलो करण्यासाठी पिताश्री होते, परंतु पिताश्रींना, फॉलो करण्यासाठी कोणीच नव्हते. तरीही केवळ शिवबाबांच्या साकार मुरलींच्या आधारे त्यांनी आपली जीवनमुक्त व कर्मातीत स्थिती प्राप्त केली होती. त्यांची कर्मातीत स्थिती ज्या क्षणी झाली त्या क्षणी त्यांनी आपल्या भौतिक शरीराचा त्याग केला. आणि ह्याच अमूल्य क्षणी पिताश्री श्री नारायणाच्या नं १ पायरीवर नव्हे तर त्याहीपेक्षा श्रेष्ठ असलेल्या अे–वन पायरीवर विराजमान झाले. श्री नारायणाला सृष्टीच्या आदि, मध्य व अंताचे ज्ञान नसल्याने तसेच ब्रह्माबाबांना सृष्टीच्या आदि, मध्य व अंताचे ज्ञान प्राप्त झाल्याने त्यांच्या जीवनाला परमात्म्यानेही श्री नारायणाच्या दैवी जीवनापेक्षा अधिक श्रेष्ठ मानले आहे. फलस्वरूप त्यांच्या संपन्न स्थितीची पायरीही श्री नाराणाच्या नं १ पायरीपेक्षा अधिक उच्चस्थानी असावयास हवी. बंधुंनो, ती सर्वोच्च परंतु सूक्ष्म पायरी तुम्ही ज्ञानाच्या तिसऱ्या नेत्राने सूक्ष्मवतनामध्येच पाहू शकता. वर्तमानसमयी पिताश्री फरिश्ता रूप धारण करून ह्या सूक्ष्म वतनमध्ये निवास करीत आहेत. त्यांच्या सूक्ष्म शरीराच्या भृकुटीत शिवबाबा विराजमान असल्याने त्या दोघांना 'अव्यक्त बापदादा' अर्थात पिता व आजोबा असे म्हटले आहे. (म्हणून भगवद्गीतेतही नवव्या अध्यायातील १७ व्या श्लोकात परमात्म्याचे महावाक्य आहे 'पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः' अर्थात मी ह्या जगताचा मातापिता व पित्यांचाही पिता अर्थात आजोबा आहे) आता विश्वमहाराजन् श्री नारायण बनण्यासाठी पिताश्रींना केवळ एक पाऊल पुढे टाकावयाचे आहे. ते पाऊल आहे बालकृष्णाचा सर्वश्रेष्ठ जन्म प्राप्त करणे होय! त्या बालकृष्णाच्या कांचनमय काया असलेल्या सर्वांग सुंदर रूपाभोवती पवित्रतेचे अलौकिक प्रभामंडल असेल. श्रीकृष्ण व राधा यांचा ज्यावेळी विवाह होईल त्यावेळी त्याचा श्री नारायण ह्या नावाने तसेच श्री राधेचा श्री लक्ष्मी ह्या नावाने राज्याभिषेक होवून ते प्रथम विश्वमहाराजन व विश्वमहाराणी म्हणून आपल्या सुवर्ण राजसिंहासनावर विराजमान होतील. बंधुंनो, ह्याच अमूल्यक्षणी नरापासून श्री नारायण व श्री लक्ष्मी बनण्याच्या महान लक्ष्याची वास्तविक पूर्ति होईल! ह्या विद्यालयात तसेच ब्रह्मावत्सांच्या लौकिक निवासस्थानी श्री लक्ष्मी नारायण ह्यांचे मनाला अलौकिक आनंद देणारे सुंदर चित्र भिंतीवर लावलेलेच असते त्या चित्रासमोर बसून चिंतन करावे की, ''पवित्र युगलरूपातील हे श्री लक्ष्मी नारायण आपल्या पूर्वजन्मात कोण होते की ज्यांनी त्या पूर्वजन्मात असे सर्वोच्च पद प्राप्त करण्याचा महान पुरुषार्थ केला असावा?'' तुम्ही ज्ञानसंपन्न असाल तर तुमच्या बुद्धीचा हाच निर्णय होईल की, असा महान पुरुषार्थ करणारे मम्मा बाबांच्याशिवाय अन्य कोणी असूच शकत नाही. कारण परमात्म्याने हे लक्ष्य अन्य कोणा संतमहात्म्याला दिलेच नव्हते. परंतु ह्या संगमयुगावर मात्र हे लक्ष्य परमात्म्याने समस्त नरनारींसाठी प्रदान केले आहे. अर्थात तुम्हीही तुमच्या पुरुषार्थानुसार सत्ययुगात देवत्त्वपद प्राप्त करू शकता. ह्या देवत्वाबरोबरच दैवी स्वराज्य प्राप्त करणे हा तुमचा जन्मसिद्ध अधिकार असेल. परंतु हा जन्मसिद्ध अधिकार तुम्हास त्याचवेळी प्राप्त होईल ज्यावेळी तुम्ही संगमयुगावर अलौकिक मरजीवा जन्म प्राप्त कराल.

श्री नारायणाचा आत्मा ८३ जन्मात व जवळजवळ ५००० वर्षांच्या कालावधीत आत्मिक पतनाच्या समस्त पायऱ्या उतरला असला तरी संगमयुगाच्या केवळ एका

अलौकिक जन्मात आत्मोन्नतीच्या समस्त पायऱ्या पादाक्रांतही करतो. ह्या सूक्ष्म पायऱ्या चढण्याउतरण्याचा जगावेगळा खेळ श्री नारायणाबरोबर ८४ जन्म घेणाऱ्या देवीदेवतांचाही चालतो. हा खेळ अनादि असल्यामुळे तो कधीही समाप्त होत नाही. ह्या अविनाशी खेळाला जो आत्मा जाणेल त्यालाच सत्यनारायणाची ८४ जन्मांची सत्यकथा यथार्थतः ज्ञात होईल. परंतु कटु सत्य तर हेच आहे की, ब्रह्मावत्सांच्या शिवाय ह्या खेळाला न जाणणारे कोट्यावधी लोक अत्यंत दुर्दैवी आहेत असेच म्हणावे लागेल. हे भारतमातेच्या सुपुत्रांनो, **ही कथा केवळ एका श्री नारायणाची नसून भारताच्या चारित्रिक उत्थान व पतनाची आहे. ही कथा आहे परमात्म निर्मित स्वर्गाची व मनुष्य निर्मित नर्काची, ही कथा आहे. मायाधीन व मायाजित होणाऱ्या महावीरांची ही कथा आहे. सुरापासून असूर व पुनः असुरापासून सूर बनण्याची, ही कथा आहे कवडीतुल्य आत्म्यांना परमात्म्याने ज्ञान व योगाद्वारे श्रेष्ठ व हिरेतुल्य बनविण्याची. ही कथा आहे पावन देवतांपासून पतित पुजारी व पतित पुजाऱ्यापासून पुनःपावन देवता बनण्याची,** ही कथा आहे आत्मिक पतन करणाऱ्या चार युगांची व आत्मोद्धार करणाऱ्या संगमयुगाची. मनुष्य निर्मित भक्तिमार्गाची व परमात्म निर्मित ज्ञानमार्गाची, ही कथा आहे. भोगबलाने दैवी राज्य गमाविण्याची तर योगबलाने पुनःदैवी राज्य प्राप्त करण्याची, ही कथा आहे स्वर्गीय शिवालयापासून नरकीय विषयालय बनण्याची, ही कथा आहे ब्रह्माची रात्र, ब्रह्माची पहाट (संगमयुग) व ब्रह्माच्या दिवसाची, ही कथा आहे परदर्शनाच्या चक्रातून मुक्त होवून स्वदर्शन चक्रधारी बनण्याची, ही कथा आहे गीताज्ञानदाता शिव परमात्म्याची व गीतापुत्र श्रीकृष्णाची, ही कथा आहे वैजयंति माळेचा जप करणाऱ्या करोडो भक्तांची व पुरुषार्थ करून त्या माळेत पूज्य मण्यांच्या रूपात स्थान प्राप्त करणाऱ्या महावीरांची, ही कथा आहे आदि अनादि स्वरूपाची स्मृति प्राप्त होण्याची व ह्या स्वरूपाची पूर्णतः विस्मृति होण्याची, ही कथा आहे सुवर्णतुल्य भारत लोहतुल्य होण्याची, ही कथा आहे संपूर्ण निर्विकारी द्विताजधारी देवात्म्यांची व ताजरहित संपूर्ण विकारी कलियुगी मनुष्य आत्म्यांची, ही कथा आहे धर्मग्लानी व धर्माच्या उत्थानाची, ही कथा आहे एका सत्यधर्मापासून अनेक धर्म निर्माण होण्याची व अनेक धर्मापासून एक सत्यधर्म स्थापन होण्याची, ही कथा आहे दोन अहिंसक युगांची व दोन हिंसक युगांची, ही कथा आहे अज्ञानापासून त्रिकालज्ञानी बनण्याची, ही कथा आहे संगमयुगावर अंधश्रद्धेचा १०० टक्के नायनाट करून यथार्थ श्रद्धेच्या निर्मितीची, ही कथा आहे सत्ययुगी दैवी राज्याच्या महास्थापनेची व कलियुगी असुरी राज्याच्या महाविनाशाची! ह्या महाविनाशापूर्वी प्रत्येक नरनारीला सत्ययुगी देवत्त्वपद प्राप्त करण्याची सुवर्णसंधी आहे. ही संधी प्राप्त करणाऱ्या साधकांनी हे सदा स्मृतीत ठेवावे की संगमयुगाचा हा मौल्यवान समय आत्मिक पतनाच्या पायऱ्या उतरण्याचा नसून आत्मोन्नतीच्या पायऱ्या चढण्याचा आहे तसेच कामक्रोधादि विकारांच्या अधीन होवून पतित बनण्याचा नाही. ह्या महान लक्ष्य प्राप्तीसाठी तुम्ही तुमच्या आध्यात्मिक जीवनात आणीबाणी घोषित करा. कारण तुमच्या आंतर्आत्म्यात विश्वातील सर्वात प्रबल शत्रू रावणाने प्रवेश केला आहे. अशी आणीबाणी तर भविष्यात देवता बनणाऱ्या रूहानी योद्ध्यांसाठी परमात्म्याने कधीच घोषित केली आहे. परंतु जे आत्मे ह्या आणीबाणीकडे दुर्लक्ष करून देवत्त्वपद प्राप्त करण्याचा पुरुषार्थ करणार नाहीत ते आत्मे सत्ययुग त्रेतायुगातील अपार सुखांपासून कल्प कल्प वंचित राहतील. खरे तर ह्या महान प्राप्तिसाठी तुम्हाला कोणताही मोठा त्याग करावयाचा नाही. त्याग कशाचा करावा व स्विकार कशाचा करावा ह्याविषयी रांगणाऱ्या बालकृष्णाचे चित्र अत्यंत बोधप्रद आहे. त्याच्या एका करकमलात वैभव संपन्न अशी पृथ्वी आहे, तर आपल्या एका पदकमलाने तो नरकीय पृथ्वीला स्वतःपासून दूर लोटित आहे. **तुम्हालाही मनबुद्धीने त्याग करावयाचा आहे ह्या नरकीय कलियुगी दुनियेचा व स्विकार करावयाचा आहे स्वर्गीय सत्ययुगी श्रेष्ठ दैवी संस्कृतिचा. तुम्हाला त्याग करावयाचा आहे देहाभिमानासहित पाच**

विकारांचा. विकारी कर्मांचा व भिन्नभिन्न व्यसनांचा, तुम्हाला त्याग करावयाचा आहे अवगुण व कुसंगतीचा, तुम्हाला त्याग करावयाचा आहे अंधश्रद्धा व अज्ञानाचा. आपला लौकिक परिवार, मित्रसंबंधी, आपला व्यवसाय, बँक बॅलन्स, गाडी, बंगला इत्यादी अबाधित तर ठेवायचे आहेच, परंतु ह्या सर्वांविषयी लोभ व मोह न ठेवता मोहन बनण्याचे लक्ष्य प्राप्त करावयाचे आहे. घरादाराचा, मुलाबाळांचा व नातलगांचा संन्यास परमात्म्याला मान्य नाही. त्याला मान्य आहे बेहदचा संन्यास!

बेहदचा संन्यास करणे हाच देवत्त्वपद प्राप्त करण्याचा पाया आहे असा संन्यास करून तुमच्या आंतर्आत्म्यात देवत्त्वपद प्राप्त करण्याची श्रेष्ठ कामना निर्माण झाली तर प्रथमतः तुम्ही ह्या विद्यालयाचा साप्ताहिकी कोर्स पूर्ण करावा. ह्या कोर्समध्येच तुम्हाला श्री नारायणाच्या ८४ जन्मांची कथा सांगितली जाईल. हा कोर्स पूर्ण झाल्यावर तुमच्या भविष्यातील २१ जन्मांच्या दैवी भाग्यासाठी केवळ २१ सप्ताह प्रतिदिन आपल्या परमशिक्षक परमात्म्याची ज्ञानमुरली श्रवण करण्यासाठी द्यावयाचे आहेत. ह्या अमूल्य काळात तुम्ही प्रत्येक ज्ञानमुरलीवर मनन चिंतन करून त्यातील ज्ञान सत्य असत्याची पूर्णतः शहानिशा केलीत तर तुमच्या बुद्धीचा हा निर्णय होईल की, परमात्म ज्ञान व त्याचा मनुष्य सृष्टीवर होणारा कल्याणकारी परिणाम हेच विश्वाचे अंतिम सत्य आहे. परमात्म ज्ञानाविषयी 'दूध का दूध और पानी का पानी' असे म्हणावयास हरकत नाही. अशाप्रकारे तुमच्या मनात परमात्म्याविषयी तसेच त्याच्या ज्ञानाविषयी निश्चय निर्माण झाला की, तुमच्या श्रेष्ठ कामनेचे श्रेष्ठ लक्ष्यात रूपांतर होईल आणि तुम्ही अल्पावधीतच ज्ञानसंपन्न व्हाल. इतकेच नव्हे तर ज्या ज्या मित्रसंबंधियांच्या निवासस्थानी सत्यनारायणाची पूजा असेल तेथे तुम्ही उपस्थित राहून सर्वांना नरापासून सत्यनारायण बनण्याच्या महान व्रताची कथा युक्तियुक्त रितीने सांगाल. ही अलौकिक सेवा करीत असतानाच देवत्त्वपद प्राप्त करण्यासाठी तुम्ही आत्मोन्नतीच्या सर्व पायऱ्या चढाल व राजयोगाद्वारे संपूर्ण पावन बनण्याचा पुरुषार्थही कराल. स्वतःला पावन बनविणे हा सात्विक व शाश्वत सुखाचा पाया आहे! असे सुख सर्वांना प्राप्त व्हावे म्हणून हा ईश्वरीय संदेश विश्वातील कोटी कोटी आत्म्यांना दिला जात आहे. परंतु फारच थोड्या आत्म्यांचा हा निश्चय होतो की मज आत्म्याच्या कल्याणार्थ ह्या ईश्वरीय ज्ञानाची मजला नितांत आवश्यकता आहे. केवळ ह्याच ज्ञानामुळे अनेक जन्मांचे कल्याण होणार आहे, ज्याप्रमाणे डॉक्टर, वकील व इंजिनियर होण्यासाठी त्या युनिवर्सिटीत जावे लागते तद्वतच सर्व दैवी गुण संपन्न, १६ कला संपूर्ण, निर्विकारी, अहिंसा परमोधर्म व मर्यादा पुरुषोत्तम ही देवतांची डिग्री प्राप्त करण्यासाठी देवतांचा रचयिता निराकार शिव परमात्म्याच्या युनिवर्सिटीत जाणे अपरिहार्य आहे. हे निश्चित आहे की, केवळ घरी लेख वाचून, पीस ऑफ माईंड ह्या चॅनेलवरील प्रवचने ऐकून अथवा ज्ञानाची केवळ प्रशंसा करून परमपित्याद्वारे सत्ययुग त्रेतायुगाचा दैवी वारसाहक्क प्राप्त होणार नाही. तो वारसाहक्क प्राप्त करण्यासाठी प्रतिदिन ज्ञानमुरली श्रवण करून राजयोगाचा अभ्यास करणे अनिवार्य आहे. राजयोगाशिवाय आत्मा संपूर्ण पावन होऊ शकत नाही. जे आत्मे संगमयुगावर पवित्रतेच्या सोळा कला संपूर्ण बनतात तेच आत्मे आपला प्रथम जन्म सत्ययुगाच्या आदिमध्ये प्राप्त करून संपूर्ण कल्पात आपले ८४ जन्मही प्राप्त करतात. अशा आत्म्यांची संख्या केवळ ९ लाख असते. ह्या मनुष्यसृष्टीच्या आदिमध्ये अत्यल्प संख्या व अंताला प्रचंड जनसंख्या होणे ही ह्या वैश्विक नाट्याची (ड्राम्याची) अनादी योजना आहे. म्हणून साधकाने हा अतूट निश्चय करावा की, 'मी आत्म्याने सत्ययुगाच्या आदिपासून संगमयुगापर्यंत ८४ जन्मांचे ८४ पार्ट बजाविले आहेत तसेच आत्मिक पतनाच्या सर्व पायऱ्या उतरून मी आत्म्याने सतो, रजो व तमोचे चक्र पूर्ण केले आहे. आता ह्या संगमयुगावर मजला सतोप्रधान स्थिती प्राप्त करीत असतानाच आत्मोन्नतीच्या सर्व पायऱ्या पादाक्रांत करावयाच्या आहेत.' ह्या निश्चयाद्वारेच तुम्ही ह्या पायऱ्या अल्पावधीतच पार करून पुन्हा आपल्या सत्ययुगी देवत्त्वपदावर विराजमान व्हाल. अशा प्रकारे तुमचे सर्वोत्तम भाग्य निर्माण होवून सर्वोत्तम

▸ पान ३१ वर

ईर्ष्या, द्वेष व घृणा यापासून सावधान...!

ब्र.कु. भगवान भाई, शांतिवन, आबू रोड

आध्यात्मिक ज्ञानाद्वारेच मनुष्याच्या जीवनात नैतिक मूल्य, मानवी मूल्य, सामाजिक मूल्य आणि दैवी मूल्य येतात. आध्यात्मिकता बीज आहे आणि सद्गुण ही त्या झाडाची फळे आहेत. **आध्यात्मिकता म्हणजेच स्वतःला, परमात्मा पित्याला तसेच सृष्टिचक्राला यथार्थरित्या जाणणे. त्याचप्रमाणे त्यानुसार आपल्या आचरणामध्ये परिवर्तन करणे. आध्यात्मिकता केवळ ज्ञान ऐकण्यापर्यंत किंवा वाचनापर्यंत असेल तर अध्यात्मवादी असताना सुद्धा जीवनात सद्गुण दिसून येणार नाहीत.** आध्यात्मिकता आणि जीवन मूल्य यांचा आपसामध्ये फारच संबंध आहे. ज्यांच्या जीवनात सद्गुण असतात त्यांचे जीवन सुखी असते. म्हणूनच सुखी जीवनासाठी आध्यात्मिकतेची गरज आहे. परंतु वर्तमान समयी मनुष्य आध्यात्मिक ज्ञानापासून दूर जात आहे किंवा त्याच्या धारणेची कमी असल्यामुळे खऱ्या सुखापासून तो दूर होत चालला आहे. त्याचबरोबर सद्गुणांच्या कमतरतेमुळे आज घराघरात रामायण आणि महाभारत घडत आहे.

रामायण आणि महाभारत यामध्ये एक-दुसऱ्याविषयी नकारात्मक भाव दाखविला गेला आहे. त्यातूनच ईर्ष्या, द्वेष व घृणा (तिरस्कार) उत्पन्न होते. परिणामता क्रोधाचा सुद्धा जन्म होतो. तसे पाहिले तर रामायण आणि महाभारतातील घटना या वर्तमान स्थितीचे द्योतक आहेत. कारण मानवी मनामध्ये मानवी मूल्यांचा अभाव होत चालला आहे. **ईर्ष्या, द्वेष व घृणा यांच्यामुळे मनाची शांती भंग पावली आहे. ईर्ष्या करणारी व्यक्ती नेहमी परचिंतन व परदर्शन करीत असते. त्यामुळे वातावरण सुद्धा दूषित होते. ईर्ष्या करणारा कधी शुभभावना व शुभकामना देऊ शकत नाही.** ज्यांच्याविषयी ईर्ष्या आहे त्याला तो दुवा (आशिर्वाद) सुद्धा देऊ शकत नाही. कित्येकदा मनातील नकारात्मक विचारांमुळे काही शारीरिक आजारही होतात. अशा व्यक्तीचे मनोबल वा आत्मबल कमजोर होत जाते.

एखाद्याच्या विषयी जेव्हा मनात ईर्ष्या उत्पन्न होते तेव्हा याला इतकी प्राप्ती कशी झाली? मी इतके अधिक करतो तरी मला कमी का? त्याने तर कमी केले तरी त्याला जादा का? असे अनेक विचार येतात. जेव्हा आपण आपल्याच बरोबरीच्या व्यक्तीशी तुलना करतो तेव्हा ईर्ष्या, द्वेष व घृणा वाढायला लागते. त्याला पाहताच आपण रस्ता बदलून दुसरीकडून निघून जातो. एखादा त्याची महिमा करत असेल तर ती आपल्याला ऐकवत नाही येवढंच नाही तर ती खोडून काढायचा प्रयत्न करतो. थोडक्यात म्हणजे आपण त्याची सफलता पाहू शकत नाही. त्याच्या कर्माची प्रगती पाहू शकत नाही.

ईर्ष्या हळू-हळू आपसामध्ये स्पर्धा किंवा जिद्द यामध्ये बदलत जाते. जर मी असा नसेल तर तुलासुद्धा असे होऊ देणार नाही. त्याची उन्नती इतकी कशी झाली? माझी का झाली नाही? त्याच्याजवळ इतके का? **अशाप्रकारे दुसऱ्याच्या अधिक प्राप्तीला पाहून ईर्ष्या उत्पन्न होते. नंतर ती मनसा-वाचा-कर्मणा क्रोधाच्या रुपाने बाहेर येऊ लागते. ज्याच्याविषयी ईर्ष्या आहे त्याला हानी पोचविण्यासाठी त्याची ग्लानी करत राहतो. त्याची निंदा-नालस्ती करतो.** परंतु लक्षात ठेवा

की जे पेराल तेच उगवते. येवढंच नाही तर शतपटीनं उगवतं. परिणामतः आपसातील संबंध बिघडतात. या अनुषंगाने एक गोष्ट याठिकाणी नमूद कराविशी वाटते.

एका नगरात दोन विद्वान राहत होते. ते विद्वान जरुर होते परंतु त्यांच्यामध्ये खूपच ईर्ष्या, द्वेष व घृणा होती. त्यामुळे ते एक दुसऱ्याशी कधी बोलत नव्हते. इतकंच नव्हे तर एक दुसऱ्याचे तोंड ही पाहात नव्हते. सदैव एक दुसऱ्याची निंदा-नालस्ती करीत असत. ही गोष्ट त्या नगराच्या राजाला माहित झाली. राजाने त्या दोन्ही विद्वानांना आपल्या राजवाड्यामध्ये भोजनासाठी निमंत्रण दिले. त्यानुसार ते दोघेही राजाकडे गेले. त्या दोघांना राजाने एकाच अतिथीगृहात ठेवले होते. थोड्या वेळाने राजा त्यांच्या अतिथीगृहात गेला. तेव्हा तेथे एकच विद्वान बसला होता. तेव्हा राजाने त्यांना त्याचे नाव विचारले, तेव्हा त्या विद्वानाने आपले नाव सांगितले. तेव्हा राजा म्हणाला की दुसरा विद्वान कुठे आहे. तेव्हा त्यांनी सांगितले की दुसरा विद्वान स्नान करण्यासाठी बाथरूममध्ये गेला आहे. तेव्हा राजा म्हणाला, मी तर त्याच्या दर्शनाची वाट कितीतरी दिवसापासून पाहात आहे. त्याच्याविषयी बरेच काही ऐकत होतो. राजा त्या विद्वानाची खूपच महिमा करत होता. परंतु समोरच्या विद्वानाला मात्र ते सहन झाले नाही. त्यामुळे तो राजाला म्हणाला, ''महाराज, तो विद्वान वगैरे काही नाही. तो फक्त लोकांकडून पैसे लुबाडण्यासाठी आपण खूप विद्वान आहोत, याच नाटक करतो. त्याला जरासुद्धा अक्कल नाही. एखाद्या बैलाला जेवढी अक्कल असते तेवढी अक्कल सुद्धा त्याला नाही.'' अशाप्रकारे तो दुसऱ्या विद्वानाची निंदा-नालस्ती करत होता. तेवढ्यात दुसरा विद्वान स्नान करून बाथरूम मधून बाहेर आला तेव्हा तो विद्वान गप्प बसला. त्यानंतर तो स्नान करण्यासाठी बाथरूममध्ये गेला. राजा त्याच्याशी बोलू लागला. राजा म्हणाला की मी त्या विद्वानाची वाणी बऱ्याच वेळापासून ऐकली. ती मला खूपच आवडली. हा विद्वान खूपच ज्ञानी वाटतो. अशा विद्वानाला भेटून मी आज धन्य झालो. अशाप्रकारे पहिल्या विद्वानाची महिमा राजा करत होता. ती ऐकणे त्या विद्वानाला असह्य झाले व तो म्हणाला, ''महाराज, तो विद्वान वगैरे काही नाही. त्याला काहीसुद्धा येत नाही. मी तर त्याला कित्येक वर्षापासून चांगला ओळखतो. एखाद्या गाढवाइतकी त्याला अक्कल नाही.'' अशाप्रकारे ईर्ष्यावश तो विद्वान तावातावाने बोलत होता. इतक्यात दुसरा विद्वानसुद्धा स्नान करून परतला. तेव्हा हा विद्वान गप्प बसला. तेव्हा राजा म्हणाला की, तुम्ही तयार होऊन भोजन कक्षात या. मी तुमच्या भोजनाची व्यवस्था करायला सांगतो. राजाने एका नोकराला बोलावून सांगितले, ''जा, दोन प्लॅस्टिकच्या प्लेट आण, एका प्लेटमध्ये गवत ठेव व दुसऱ्या प्लेटमध्ये भूसा ठेव.'' थोड्या वेळाने ते विद्वान भोजनासाठी आले. डायनिंग टेबलावरील त्या प्लेट पाहून, विद्वान म्हणाले, ''महाराज हे काय आहे?'' तेव्हा राजा म्हणाला ''हे तुमचे भोजन आहे'' तेव्हा दोघे विद्वान एका स्वरात म्हणाले, ''हे आमचे भोजन?'' तेव्हा राजा म्हणाला, ''तुम्हीच म्हणत होता की तुमच्यापैकी एक बैल आहे आणि दुसरा गाढव आहे. म्हणून मी बैलासाठी गवत आणि गाढवासाठी भूसा मागवला आहे.'' तेव्हा त्या विद्वानांच्या लक्षात त्यांची चूक आली व ते दोघे गप्प बसले. तसेच त्यांनी ईर्ष्यावश एक दुसऱ्याची निंदा करणे कायमचे सोडून दिले.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे एका व्यक्तीविषयी सुद्धा आपले हृदय मलीन असेल तर परमात्मा आपल्या हृदयात कसा वास करेल? परमात्म्याला आपल्या हृदयात बसविण्यासाठी हृदयाची स्वच्छता असणे आवश्यक आहे. जन्मजन्मांतरापासून आपले हृदय ईर्ष्या, द्वेष, घृणा, वैर-विरोध, परचिंतन इत्यादी गोष्टींमुळे मलीन झाले आहे. ते स्वच्छ करण्याची सुवर्ण संधी आपल्याला संगमयुगातच प्राप्त होते. आता जर ते स्वच्छ बनवले नाही तर अन्य कुठल्या युगात ते स्वच्छ बनवाल? मुख्य म्हणजे जर का आता आपण हृदयात परमात्म्याला बसवले नाही तर निकट भविष्यातील महाभारी विनाशकारी महाभारतामध्ये कोण आपला सारथी बनून सोबत देईल? तात्पर्य म्हणजे जर आपण आपल्या हृदयाला स्वच्छ बनवले तरच स्वतः परमात्मा आपला सारथी बनून, मदतगार बनेल.

तसेच ज्ञान व योगाचे सार देखील हेच आहे की सर्व विकारांपासून मुक्त, संपूर्ण निर्विकारी बनणे. **त्यामुळे आपले हृदय इतरांविषयी स्वच्छ बनविण्यासाठी शिवबाबांनी अनेक वेळा समजावून सांगितले**

आहे की ''प्रत्येकाचा पार्ट हा वेगवेगळा आहे. जे घडत आहे ते चांगले घडत आहे. परचिंतन पतनाची जड आहे. प्रत्येकाला त्याच्या मागील कर्माप्रमाणे प्राप्ती होत असते ड्रामा हुबेहूब रिपीट (पुनरावृत्त) होत असतो. 'नथिंग न्यू'. सर्व गोष्टींमध्ये कल्याण सामावलेले आहे.'' आपल्याला जर कोणी मान देत नसेल, विचारत नसेल तर परमात्मा पित्याने आपल्याला किती सन्मान वा स्वमान दिला आहे, तो स्मृतीत आणा. जर कोणी आपल्या चुकांविषयी इशारा देत असेल तर स्थिर मनाने तो नीट ऐका. त्यानुसार परिवर्तन करा तरच आपली दिवसेंदिवस प्रगती होत जाईल. म्हणूनच म्हटले जाते- 'निंदकाचे घर असावे शेजारी' अशा धारणेमुळेच आपल्या व्यवहारामध्ये सहनशीलता, धैर्यता, नम्रता इत्यादी सद्गुण दिसून येतील.फलस्वरूप आपल्या संस्कारात परिवर्तन होत जाईल. त्याचबरोबर ज्याला आपल्या सेवेचा, विशेषतांचा व कलेचा अभिमान आहे, आपल्या सेवेचा अधिक लगाव आहे, कर्तेपणाचा भाव आहे, त्याच्याशी लोक ईर्ष्या करतात, म्हणून नेहमी लक्षात ठेवा की कर्ताकरविता परमात्मा आहे, मी केवळ निमित्त मात्र आहे. अशा प्रकारचा निमित्त भाव असणाऱ्याची ईर्ष्या कुणीही करीत नाही.

वर्तमान समयी ईर्ष्या, द्वेष व घृणा ही जी विकारांची वंशावली आहे, यावर विजय मिळविणे गरजेचे आहे. हीच साधकाला अधिक परेशान करताना दिसत आहे. तसेच संघटन कमजोर करण्याचे कार्य करीत आहे. त्यामुळे आपल्यात हे विकार नाहीत ना, हे चेक करा. हे विकार जर असतील तर ५ विकारांचा अंश आपल्याला शिल्लक आहे, असे समजा. तसेच हा विकारांचा अंश पुन्हा वंशसुद्धा निर्माण करू शकतो, हे लक्षात ठेवा. त्यामुळे विकाररूपी रावणाला अगदी अंशसहित दहन करा.

सध्याच्या जगात मनुष्य स्वतःच्या दुःखाने तर दुःखी आहेच परंतु दुसऱ्यांच्या सुखामुळे तो अधिक दुःखी आहे. दुसऱ्यांशी आपल्या भाग्याची तुलना करून, ईर्ष्येच्या अग्नीत तो आयुष्यभर जळत असतो. तो हे विसरतो की ड्रामा अनुसार प्रत्येकाचे आपले-आपले भाग्य आहे. मग दुसऱ्यांची ईर्ष्या करून आपल्याला काय मिळणार? याउलट ईर्ष्या करणाऱ्याच्या पुण्याचे फळ आणि बळसुद्धा ईर्ष्येच्या अग्नित संपून जाते. **म्हणूनच अंतर्मुखी बनून निरंतर योगी, कर्मयोगी बना. तसेच आपले बोल व कर्म यांच्यात समानता आणा. सदैव आपल्या श्रेष्ठ स्वमानात राहा व हे सृष्टिरूपी नाटक साक्षी होऊन पाहा तरच ईर्ष्या, द्वेष व घृणा यांच्या अग्निपासून आपले रक्षण होईल.** सारांशाने असे म्हणता येईल-

ईर्ष्या, द्वेष व घृणा
असती अंश रावणाचे।
दहन करता त्यांचे,
दिवस येती स्वराज्याचे।।

■■

▶ पान २८ वरून

कल्याण होण्यातच शिवबाबांचे, ब्रह्मा बाबांचे व ब्रह्मावत्सांचे सात्त्विक समाधान आहे. माझ्या आत्मिक बंधुंनो, भक्तिमार्गात अप्रत्यक्षरित्या परमात्म्याने आपल्या सर्वांच्या अनेक इच्छा पूर्ण केल्या आहेत. आता ही शुभवेळा आहे आपण सर्वांनी त्याची अलौकिक इच्छा पूर्ण करण्याची. **परमात्म्याची कल्याणकारी इच्छा हीच आहे की तुम्ही सत्ययुगात देवता रूपात जन्म प्राप्त करून स्वर्गीय सुख लुटावे. या त्यांच्या इच्छेत तुमचेच जन्मजन्मांतराचे कल्याण आहे, ती इच्छा पूर्ण करणार नाहीत काय? ह्या त्यांच्या इच्छा पूर्तिसाठी संपूर्ण पावन बनणे आवश्यक आहे.** त्यासाठी प्रतिदिन ज्ञान गंगेत स्नान करून अमृतवेळेला शक्तिशाली संकल्पाद्वारे आपल्या मस्तकी राजाईचा ताज ठेवून राजतिलक लावून राजतख्तावर विराजमान व्हा. आपल्या संकल्पांची सिद्धी होणे हा आपला जन्मसिद्ध अधिकार आहे! आपणास ही विस्मृती कधीही होवू नये की, पतित पावन केवळ निराकार शिव परमात्माच आहे. तोच पतित आत्म्यांना त्यांच्या पुरुषार्थानुसार पावनतेच्या सवोच्च शिखरावर नेवून ठेवतो. जे महारथी आत्मे ह्या शिखरावर विराजमान होण्यासाठी संगमयुगावर पुरुषार्थाचा 'कळस' करून साऱ्या विश्वात चमकतील ते आत्मे द्वापर कलियुगात भक्तांचे इष्ट देव बनतील. मूर्तिकार त्यांच्या मूर्ति बनवतील तर त्या प्रत्येक मूर्तिसाठी भक्तजन भिन्नभिन्न कलाकृतींनी परिपूर्ण असे सुंदर मंदिर बनवतील. अर्थात त्या प्रत्येक मंदिरावर चमकणारा कळस असेल. बंधुंनो, असा चमकदार पुरुषार्थ करून आपण आपल्या पारलौकिक पित्याची अंतिम इच्छा पूर्ण करूया. ■■

३० मिनीटे चालण्याचे ३० फायदे

जर आपण सकाळी लवकर उठून ३० मिनीटे घराच्या बाहेर फिरायला जाण्याची तयारी ठेवत असाल तर प्रथम आपले अभिनंदन! कारण आपण दिर्घायुषी व्हाल तसेच आपले आरोग्य उत्तम राहील. त्यामुळे आपण पुढील ३० फायदे लक्षपूर्वक वाचा.

१. एकही पैसा खर्च न करता, हा व्यायाम करता येतो.
२. सर्वांना करण्यासाठी सहज व सोपा व्यायाम प्रकार आहे.
३. कोणाच्याही मार्गदर्शना शिवाय करता येणारा व्यायाम प्रकार आहे.
४. शरीर स्वस्थ्य व चपळ ठेवण्यासाठी एकमेव व्यायाम प्रकार आहे.
५. सकाळी चालण्यामुळे सकाळच्या वातावरणातील शुद्ध प्राणवायुचा शरीराला चांगला पुरवठा होतो.
६. हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक असलेले 'डी' जीवनसत्त्व सकाळच्या कोवळ्या उन्हात असते.
७. चालण्यामुळे एकाच वेळी शारीरिक व मानसिक थकवा दूर होतो.
८. सतत काम करून तन-मनाला आलेला थकवा चालण्यामुळे दूर होतो.
९. चालण्यामुळे तणाव आणि चिडचिडेपणा दूर होण्यास मदत होते.
१०. चालण्यामुळे झोपही चांगली लागते.
११. मनाच्या एकाग्रतेसाठी व चिंतनासाठीही चालणे फायदेशीर ठरते.
१२. वजन कमी करण्याचा किंवा वजन संतुलित ठेवण्याचा चालणे हा उत्तम उपाय आहे.
१३. चालण्यामुळे शरीरातील जास्तीचे उष्मांक (कॅलरीज) जळतात.
१४. चालण्यामुळे शरीरातील चरबीचे प्रमाण कमी होते.
१५. दररोज एक तास चालण्याने संधीवाताचा त्रास कमी होतो.
१६. चालण्यामुळे पचनक्रिया सुधारते; मलबद्धतेसारखे पचनाचे विकार कमी होतात.
१७. झपाझप चालल्याने हृदयाची गती व स्टॅमिना वाढतो.
१८. नियमित चालण्याची सवय असणाऱ्यांना हृदय विकारामुळे मृत्यू येण्याचे प्रमाण ५०% पेक्षा कमी असते.
१९. नियमित चालणाऱ्यांची फुप्फुसाची कार्यक्षमता वाढते.
२०. नियमित चालण्यामुळे पाठीचे दुखणे, हृदयरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब व श्वासाच्या त्रासावर नियंत्रण मिळवता येते.
२१. नियमित चालण्यामुळे चयापचय संस्था सुधारते. अंतस्त्रावी ग्रंथीचे कार्य सुधारते.
२२. हाडांची मजबूतीदेखील चालण्यामुळे वाढते.
२३. नियमित चालण्यामुळे कंबर, मांड्या व पायाचे स्नायू मजबूत होतात.
२४. मोतीबिंदूची शक्यता कमी होते.
२५. नियमित चालण्यामुळे काही विशिष्ट प्रकारच्या कॅन्सरपासून बचाव होतो.
२६. नियमित चालण्यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढते.
२७. चालण्यातून नैराश्याची पातळी खाली येण्यास मदत होते.
२८. दररोज ३० मिनीटे चालण्यामुळे सरासरी आयुष्य ३ वर्षांनी वाढते.
२९. नियमित चालणे ही दीर्घायुष्याची किल्ली आहे.
३०. चालण्याचा व्यायाम करण्याआड वय मात्र कधीही येत नाही. त्यामुळे अगदी नव्वदीतही शरीर साथ देत असेल तर चालण्याचा व्यायाम करू शकता, मात्र झेपेल इतकाच!

धन्यवाद!

■■